
म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र ८९६

डे कृत

म न.



IRBK-0100896

IRBK-0100896
IRBK-0100896

भारतमाता:—बाळा, बळवंता येरे मला भेटरे लौकर.

# संगीत पुनरागमन

[illegible] वाचनालय [illegible]
...९०८...
...१२५...

लेखक

**बाळकृष्ण नारायण पांडे**

मातृपदीं, वर पाहिजे, विश्वमोहन, वेणीचें वेड वगैरे नाटकें व ऋणानुबंध कादंबरी या ग्रंथांचे कर्ते.

---

प्रथमावृत्ति २०००

---

सन १९२९

IRBK-0100896
IRBK-0100896

---

किंमत बारा आणे.

प्रकाशक:--

सदाशिव अप्पाजी वैशंपायन.
४९४ बुधवार पुणें

या नाटकाचे रंगभूमीवरील प्रयोगाचे अधिकार रा. शंकरराव सरनाईक
यांच्या यशवंत संगीत मंडळीकडे आहेत. चित्रपटावरील
प्रयोग, प्रकाशन, व भाषांतर वगैरे सर्व अधिकार
लेखकाकडे आहेत.

मुद्रक:--

श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
राजगुरु आणि कंपनीज् प्रेस,
५१३ शनवार पेठ, पुणें नं. २.

# अर्पण-पत्रिका

कै० परमपूज्य
नाट्यगुरु श्री. गो. ब. देवल
यांच्या पुण्यस्मृतीस
समर्पण.

—बा. ना. पांडे.

|| श्रीराम ||

# पूज्य वाङ्मयतपस्वी श्रीयुत कृ. ल. सोमण उर्फ 'किरात' यांचा आशीर्वाद.

श्रीयुत रा. रा. बाबासाहेब पांडे यांची "विश्वमोहन," "सं. पुनरागमन" व "स्वयंनिर्णय" हीं तीन नाटकें वाचून पाहण्याचा सुयोग मला लाभला. यापूर्वीं यांच्या "वर पाहिजे" व "मातृपदीं" या दोन नाटकांचे प्रयोग नाट्यकला प्रसारक ना. मं. करीत असलेले–मला पहावयास मिळाले होते. हे प्रयोग पहात असतांना प्रस्तुत नाटककारासंबंधानें माझा फारच अनुकूल असा ग्रह झाला, व त्याचें पर्यवसान कविविषयक प्रेमादरांत झालें. नाटककारास लागणारे आवश्यक गुण–म्हणजे सहृदयता, भावनाप्रधानत्व, नाट्यकौशल्य, भाषाप्रभुत्व, विचारगांभीर्य, कुशल चित्रकारित्व इ०––ह्या दोन्हीहि नाटकांमधून पदोपदीं आढळून आलें आणि म्हणून मला वाटतें माझ्या अंतःकरणांत प्रेमादराची वृत्ति आपोआप वृद्धिंगत झाली. हृदयाची ओळख हृदयाला पटली, आणि त्यामुळें हृदयास अभिनव आनंदाचें भरतें आलें. वर उल्लेखिलेले गुण याहि नाटकांत प्राचुर्यानें प्रत्ययास आले व रंगभूमीस लागणारा हा एक प्रमुख गुण त्यांच्या ठिकाणीं आहे हें पाहून आनंद व संतोष झाला.

"विश्वमोहन" नाटकांत दृग्गोचर होणारें तत्वज्ञान व त्यांत वाहणारे भक्तिसुधेचे मनोहर ओहोळ यांच्या योगें सात्विकभाव यदृच्छेनेंच उद्भुत होतात, आणि त्या योगें विश्वमोहन ह्याची साक्ष पटविली जाते.

सं. "पुनरागम" नाटकांत तर प्रतिभेच्या उच्च भरारीबरोबरच कवीच्या ठिकाणीं असणाऱ्या कै. लोकमान्य टिळकांविषयींच्या पूज्य बुद्धीमुळें आणि उत्कट भक्तीमुळें त्यांची स्वदेशभक्ति मूर्त स्वरूपानें अवतरत असल्याचें पूर्णपणें प्रत्ययास येतें. प्रस्तुत नाट्यकृतींत **काव्य** आणि **नाट्य** या दोहोंचा

कृष्णा-कोयनेच्या सुरेख आणि मनोहर अशा प्रीति-संगमासारखा हृदयंगम संगम घडून आल्याचें अनुभवास येतें.

यांच्या साऱ्याच नाटकांत सुंदर सुंदर सिद्धांतरूपवचनें, मुक्तासर तुटून त्यांचीं मोत्यें गळून जशीं इतस्ततः विखुरलीं जावीं त्याप्रमाणें जागजागीं पसरलीं असल्याचें प्रत्ययास येतें.

श्रीयुत पांडे यांस परमेश्वरानें आयुरारोग्य देऊन दीर्घायुषी करावें व त्यांच्याकडून जें कार्य करविण्याची जगत्प्रभूची इच्छा आहे तें कार्य त्यांच्याकडून करवून घेण्याकरितां अनुकूळ व आवश्यक अशा परिस्थितींत त्यांना ठेऊन, " यशस्वी नाटककार " म्हणून त्यांचें योग्य अभिनंदन व गौरव करण्याचा समय लौकर आणून द्यावा, अशी त्याच्या चरणाजवळ प्रार्थना करून मी विराम पावतों.

पुणें, आषाढ शु. ५
शके १८५०

किरात.

# दोन शब्द

प्रस्तुत नाटकाचा जाहीर प्रयोग यशवंत संगीत मंडळीकडून पुणें किर्लोस्कर थिएटरांत ता. १४-९-१९२९ रोजीं झाला.

चार वर्षांपूर्वीं लिहिलेलें हें नाटक आज वाचक-प्रेक्षकांच्या पुढें येत आहे ही ईश्वराची कृपा होय.

हल्लीं मीं आजारी असल्यामुळें नाटकांतील पद्यें स्वतः तयार करूं शकलों नाहीं. तें कार्य माझे कविमित्र रा. **कुमार यशोद** यांनीं माझेकरितां मोठ्या प्रेमानें, परिश्रमानें आणि उत्साहानें केलें आहे; मी त्याबद्दल त्यांचा अत्यंत आभारी आहें.

यशवंत संगीत मंडळीचे मालक रा. **शंकरराव सरनाईक** व त्यांचे सहकारी यांनीं या नाटकाबद्दल बहुत श्रम घेतले व सुंदर सजावटीनें नाटक बाहेर आणण्याचे कामीं त्यांनीं मोठ्या हौसेनें प्रयत्न केले; याबद्दल मला त्यांचा मोठा अभिमान वाटतो. ईश्वर कृपेनें त्यांचा हा प्रयत्न चांगल्या प्रकारें सुफलित होवो.

प्रत्यक्ष लेखकाबद्दल पुणें येथें मुक्काम असतांना आजारांत रा. सरनाईक यांनीं जो आपलेपणा दाखविला व प्रेमानें विचारपूस करीत राहून सर्वतोपरीं माझी काळजी घेतली, त्याचा आभारपूर्वक उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं.

रा. सदाशिवराव वैशंपायन यांनीं पुस्तक छापण्यांत दाखविलेली तत्परता व पुस्तक आकर्षक स्वरूपांत अंतर्बाह्य सुंदर करण्यांत दाखविलेली उत्सुकता अंतःकरणांत त्यांच्या नवीन परिचयाबद्दल आनंद उत्पन्न करितात.

थोर राष्ट्रपुरुषाचें निर्याण झालें म्हणजे राष्ट्र शोकसागरांत बुडून जातें. पुनर्जन्माच्या कल्पनेप्रमाणें त्यांनीं शक्य तितक्या लवकर परत जन्म घ्यावा अशी त्याची इच्छा असते. ही इच्छा व तिची पूर्ती याच्यामधील काल्पनिक घटना लोकमान्य ही विभूति समोर ठेवून रेखाटण्याचा या नाटकांत प्रयत्न केला आहे; एवढेंच थोडक्यांत या नाटकासंबंधीं सांगावयाचें आहे.

परमेश्वर सर्वांचें शुभ करो.

बऱ्हाणपूर **बाळकृष्ण नारायण पांडे.**

## पुनरागमन नाटकांतील नटांची यादी.

———X———

| | | | |
|---|---|---|---|
| भारतमाता... | .... | ... | महाराष्ट्रकोकिळ शंकरराव सरनाईक |
| विष्णू ... | ... | ... | नटवर्य कृष्णराव गोरे |
| नारद .... | ... | .... | श्री. वामनराव सडोलीकर |
| लोकमान्य ... | ... | .... | श्री. हरीभाऊ घोडके |
| इंद्र ... | ... | .... | श्री. गणपतराव वाटवे |
| शचि ... | ... | ... | मास्टर निवृत्ती सरनाईक |
| माधविका ... | ... | ... | श्री. करमरकर |
| मालविका .... | ... | ... | मा. गोविंद वाटवे |

फोटोग्राफर:—सन आर्ट स्टुडिओ,
बुधवार, पुणें सिटि

नि. ........ ८१२८५

॥ श्रीराम समर्थ ॥

# संगीत
# पुनरागमन

## अंक १ ला

### प्रवेश पहिला

( श्री नारद मुनींची स्वारी अंतरिक्षांतून मेघखंडावर आरोहण करून खालीं उतरत आहे, असा देखावा. )

पद–( चालः–जाके मथुरा )

नारद०—

**जीवा भजनीं प्रभुजीच्या लाभतसे थारा। ध्यानिं सदा ।निज मग्न रहावें, इतर विषय नच ठावा! ॥ धृ० ॥ पुनरागमनीं प्रभुवर समुदित। युगिं युगिं धरि अवतारा ॥ १ ॥**

आज किती तरी दिवस झाले मृत्युलोकांतून माझा संचार झाला नाहीं, त्यामुळें या लोकची कांहीं एक वार्ता मला कळलेली नाहीं. कलियुगाचा कोलाहल सुरू झाल्यापासून या लोकांवर कहर उसळल्यासारखा झाला असला तरी मधून मधून भगवंताच्या अवताराचे तेजस्वी किरण या प्रदेशावरील निबिड अंधःकारांत प्रवेश करीत असल्यामुळें येथल्या राहटीला जें एक प्रकारचें नाविन्य प्राप्त होतें तें मी आजवर मोठ्या कौतुकानं अनुभवलं आहे. नुकतंच कैलासीं श्रीमहेश्वरांनीं मृत्युलोकांतल्या सांप्रतच्या सत्त्वश्रेष्ठांचं केलेलं वर्णन अझूनही कानांत दुमदुमत आहे. असा एकादा महात्मा मला

भेटल्यास कांय आनंद होईल ? पण हें काय ?–हा मेघांचा कडकडाट व विजांचा लखलखाट एकाएकी सुरू होऊन पर्जन्यही जोराचा सुरू झाला ! तेजोरश्मी सूर्यनारायणानं काळ्या छत्राच्या आंत स्वतांला झाकून घेतलं ! स्वर्गंगेच्या पवित्र पाण्यानं व पंचमहाभूतांच्या ह्या धूमधडक वायगर्जनेच्या उच्च स्वरांत पर्वतावरील वृक्षांच्या पानांच्या आवाजांतून वेदमंत्राचे ध्वनि काढीत देवांनीं आज या भूलोकांवर जणूं काय अभिषेकच सुरू केला आहे. नगराज हिमालयाच्या एखाद्या गुहेंत थोडा वेळ विश्रांति घेऊन मार्ग आक्रमण करूं या- ( चालूं लागतात तोंच रुदनस्वर ऐकूं येतो ) अरे ! हा रुदनस्वर कुठून बरं ऐकूं येतो आहे ? नगराजाच्या कृपाछलाखालीं स्वसंतुष्ट योगीजनावांचून कुणा दुसऱ्याचं वास्तव्य असणं संभवनीय नाहीं. मग हा आर्तस्वर कुणाचा ? या भूलोकावरहि या वेळीं दुःखाची भेसूर छाया पडली असून सूर्यनारायणानं या पर्वतशिखरामागून हळूंच काढलेल तोंड घामानं डवडवून गेलेलं आहे व त्याच्या नेत्रांतून पडणाऱ्या अश्रुधारा या हिमशृंगावरून सारख्या वहात आहेत. वाऱ्याचं तांडव थांबलं असून मेघमाला निस्तब्ध झाल्या आहेत ! ( ऐकून ) हें रडणं अधिकच जोरानं ऐकूं यायला लागलं आहे ! मला त्याचा शोध केलाच पाहिजे ! ( जातात )

( पडदा वर जातो. भारतमाता सिंहाला टेकून बसली आहे व शोक करीत आहे असा देखावा. )

**भारत०** —बाळ! माझ्या बलवंता ! माझ्या देदीप्यमान बाळसूर्या, लाडक्या, मला अभागिनीला आशेचे किरण नुसते दिसण्याच्या आयत्या वेळीं तुला माझ्या जवळून जावसं कसं वाटलं ? जवळ जवळ कायमच्या अज्ञातवासांत मी आज कित्येक वर्षं पडून राहिली असल्यामुळं दुःखाचा आवेगही येण्याइतकं माझं शरीर जड झालं असतांना तूं आपल्या स्फूर्तीनं आजवर नवजीवन पाजायला सुरवात करून त्याला तकवा यायला लागला असतांना बाकीचं कार्य गुंडाळून, माझ्या राष्ट्रसूत्रधारा ! त्रिलोकमान्या ! राजसराजा ! मला सोडून तुझ्यानं जाववलं तरी कसं ? सूर्यनारायणा ! रोज नवा मुगुट माझ्या मस्तकावर घालतांना तूंच नाहीं का सांगत होतास कीं, आई स्वातंत्र्याचा मुगुट बलवंतानं तुझ्याकरितां स्वतःच घडवायचं सुरू केलं आहे ! कायरे लागत नाहीं का तुला पत्ता माझ्या बाळाचा ? बाळा, कुठं रे पाहूं तुला आतां ! काय

म्हणतोस ? काळानं तुला आपल्याकडे नेलं ? नाहीं कारे–कुणीं माझा सुपुत्र या काळाच्या दाढा उपटून काढून त्याला चिरडायला ! काळा ! कठोर कृतांता ! ही चोरी पचणार नाहीं बरं तुला ? आजपर्यंत माझे किती लाडके तुझ्या उदरांत गडप्प झाले. पण हा नाहीं बरं तुला पचायचा. तुझी विद्या तुलाच भोवेल आणि कचासारखा तुझं हृदय फाडून त्यांतून हा बाहेर पडेल ! दाखवा हो कुणी माझा बाळ !

पद–( चालः–हरित दुरित )

**भ्रमत दमत आजि भरतकुल जननि । रडत हाय जरि जगासि मोहिनि ॥ ध्रु० ॥ भारतभूवरि । मातृहृदावरि । दया करुनि हरि, भया हरिं, शरण ! ॥ १ ॥ एकवार जरि । जगासि भारी । आज परी करि कुणी सुखहरण ! ॥ २ ॥**

बाळा ! तान्हुल्या ! माझ्या राजहंसा ! भारतकुलतिलका ! येरे, भेट रे मला लौकर ! तुझ्यावाचून माझे प्राण जाताहेत रे ! ( मूर्च्छित होते ) ( नारद येतात )

**नारद०**––इथंच कुठुन तरी तो रुदनस्वर मला स्पष्ट ऐकूं येत होता ! इतक्यांत एकाएकीं थांबला ! नारायणा ! या दुःखी प्राण्याचं दुःख थोडं तरी कमी करण्याचं पुण्य ह्या तुझ्या सेवकाला लाभू दे ! या गुहेंतच शोध करावा ! ( जाऊं लागतात व मूर्च्छित भारतमातेला पाहून दुःखानं ) हाय हाय ! शोकावेगानं मूर्च्छित झालेली भारमाता ! आणखीन् कोणतं नवीन दुःख हिला झालं असावं बरं ! मातुश्री ! सावध व्हा ! ( जवळच्या झऱ्यांतून पाणी आणून अंगावर शिंपडतात )

**भारत०**––कोण ! देवर्षे ! कुणीकडे तुम्ही या वेळीं ? इकडं तुम्ही फारसे–

**नारद०**––( स्व० ) देवीच्या प्रश्नाला उत्तर द्यायला आह्माला तोंडच नाहीं ! ह्मटलं तर हिच्या दुःस्थितीकडे आमचं लक्ष मुळीं गेलेलंच नाहीं ! आमचेकडे कृतघ्नतेचा दोष खालीनं येतो.( प्रगट ) आई !––

**भारत०**–– नारदा ! माझा बाळ बघितला काहो तुम्ही ! गेलाहो– ( कपाळावर हात मारते )

**नारद०**--मातुश्री ! शोकावेग आवरा व आपल्या दुःखाचं कारण मला सांगा ! कोणता आपला बाळ ? कुठं गेला ?

**भारत०**--देवर्षे ! तुम्हीं उगीच अंतरज्ञानी ह्मणून मिरवितां ! नारदा पहा ! या लोकाकडे पहा ! दिवसास रात्र झालेली तुम्हाला नाहीं दिसत ? दाही दिशा शोकमग्न झालेल्या तुमच्या ध्यानांत नाहीं येत ? तुमच्या वीणेच्या तारा छेडून बघा त्यांतून करुणस्वर निघतो कीं नाहीं ? नारदा ! माझा लाडका, माझा चिंतामणी ! माझा धैर्याचा महामेरु, माझा प्रति भीष्माचार्य 'बालतिलक' माझ्या जवळून काळानं हिरावून नेला ! माझ्याकरितांच तो जन्मला, जगला, आणि केवळ माझ्याकरितांच अनेक संकटाशीं झगडत असतांना माझा वीर अभिमन्यु, काळाच्या चक्रव्यूहांत सांपडून गत झाला ! नारदा ! मला कसं बरं वाटेल हो त्याच्यावाचून ! नारदा ! तुम्ही माझे सुपुत्र ना ! ध्यानांत ठेवा ! माझा बाळ मला परत मिळाला पाहिजे !

**नारद०**--( स्व. ) मातृहृदयाला तोड नाहीं ! बलवंतासारखा वीरपुत्र गतप्राण झाल्यावर कोणतं मातृहृदय असं विदीर्ण होणार नाहीं ! आतां यांचं सांत्वन तरी कोणत्या रितिनं करावं ? कांहीं तरी तोड काढलीच पाहिजे ! ( उ० ) मातुश्री--

**भारत**--नारदा ! फार विचार करतो आहेस ! मला देखील एखादी लोणकढी थाप देण्याच्या विचारांत आहेस वाटतं ? नारदा, तुम्हीच सर्वांनीं माझ्याकडे दुर्लक्ष्य केलेलं मला दिसत नाहीं कारे ! तुम्हाला बोलायला तोंड तरी आहे काय ? एवढी कसली रे तपश्चर्या करितां एकसारखी ? कांहीं पुण्य माझ्या बाळाच्या प्रयत्नांशीं जुळविलं तर--माझा बाळ तुमच्यापेक्षां कमी पुण्यवान् नाहीं बरं ! कोणत्यारे काळानं त्याला नेलं ? नारदा ! मातृऋण फेडण्याचं कर्तव्य तुह्मी विसरलांत ! परमेश्वरानं मला तुमचीही आठवण येऊं देण्याचं कारण ठेवलं नव्हतं पण दुर्दैवी मी! माझा बाळ गेलान् पुन्हां ही अशी दशा--

**नारद**--आई ! दैवगतीपुढं कुणाचं काय चालणार ? जरा धीर धरा !

**भारत०**--देवर्षे, दुबळ्या दैवाचं रडगाणं आजवर तुह्मी काय थोडं ऐकलं ? दैवाची दिखाउ दिवटी विझवून टाकून पुरुषार्थाचा पवित्र प्रकाश माझ्या बाळानं पाडल्याचं तुमच्या ध्यानांत नसेल ! मला भोळसर नाहींना समजलांत ? सांगा माझा बाळ तुम्हाला परत आणून देता येतो कां नाहीं ?

सांगा ! मी ह्मणाल तिकडं तुमच्या बरोबर येतें ! नारदा ! माझी निराशा करूं नका ! मला माझा बाळ पाहिजे आहे! मला तुमचं तत्त्वज्ञान नको आहे ! विष्णूला सांगा, शंकराला सांगा, नाहींतर त्या मेल्या काळाला सांगा ! माझा प्राण माझ्या स्वाधीन करा नाहींतर त्या सर्वांना सांगा, मी तुम्हांला शापून टाकल्यावाचून राहणार नाहीं ! माझ्या दुःखाकडे काणा डोळा करून चालणार नाहीं ! माझं हरवलेलं रत्न माझ्या स्वाधीन न झालं तर साऱ्या जगतांत प्रलयाचा वणवा पेटवून देईन ! वेदाच्या प्रत्येक ऋचेमधून अग्निवर्षाव होईल ! समुद्राची मर्यादा सुटून सारा भूगोल जलमय होऊन जाईल व नारदा ! केवळ माझ्या इच्छेकरितां भगवंताला नवा अवतार घ्यावा लागेल !

**नारद**––मातुश्री ! क्षमा करा ! मृत्युलोकाचा प्राणी एकवार गत-प्राण झाला ह्मणजे तो परत कसा येऊं शकेल ? त्यानं पुन्हां ताबडतोब जन्म घेणं शक्य आहे. पण––तोंपर्यंत आपला मोहन नाहीं का ती जागा भरून काढायला ?––( स्व० ) बघूं या जुळतं कां कांहीं !

**भारत०**––तें मला कळतं हो सारं ! माझ्या मोहनच्या तपाला बाळाच्या कर्मयोगाच्या धडाडची जोड मिळाली असती तर आजला––( रडत ) नारदा––मी या विश्वाची स्वामिनी झालें असतें ! माझा मोहन––एकाकी पडला, सारी बजबजपुरी माजली, वितंडवादांच्या कोलाहलांत काळ जाऊं लागला ! नारदा ! माझी बंधनं ढिली होण्याऐवजी अधिकाधिक घट्ट व्हायला लागलीं. ( विव्हल होऊन ) देवर्षे! कांहीं नको, मला शक्य–आणि अशक्य कळत नाहीं ! माझा बाळ दाखवितां ना मला ! आणतांना त्याला ?

३ पद–( चाल;––बन्सिवाले कान्हा )

**दीना माय शोधी तान्हा । लव निघत धीर ना ! ॥ धृ ॥**
**नाहीं अनुकंपा जगिं या । देवा, जिवासि चैन ना ! ॥ १ ॥**

मीच जातें नाहींतर त्याला शोधयला ! बसा तुह्मी आपलें टाळविणा वाज-विंत ! बाळा लाडक्या ! माझ्या सोनुल्या––( मुर्च्छित )

**नारद**––( पुढें येऊन ) आतां काय करावं ? अशक्य गोष्ट शक्य कशी करुन दाखवावी ! इथं वेदांताचं काय चालणार ? फाटलेल्या हृदयाला वेदां-

तार्चे ठिगळ कसं लावूं शकणार ? ही वेदजननी, सर्व मानवकुळाची आदि-माता, वेदांताचीही राजराजेश्वरी माझ्या सारख्याच्यानें कशी समजावली जाणार ? बलवंताचं निर्वाण कोणाचं अंतःकरण दुःखानं व्याप्त करणार नाहीं ? मातुश्रीतर अझून बेशुद्धच आहेत ! मला वाटतं श्रीमन्महाविष्णूकडे याची वर्दी द्यावी व ते सांगतील त्याप्रमाणं करावं ! हा महात्मा स्वर्गाचा रस्ता चालत असेल ! तर जातां जातां तिकडनंच क्षीरसागराकडे वळावं म्हणजे झालं ! पहावं मातुश्रींना दोन समजुतीच्या गोष्टी सांगून वळलं तर ! मातुश्रींनीं आज आमची खूबच हजेरी घेतली ! आणखी कुणाकुणाची हजेरी होते हें दिसेलच !

४ पद-( चाल, हरहर देव )

**अवतार घेई । दशविध हरि सुखनीमाधिं जियेच्या । जरि ती असुखी तरि सुरनाश ! ॥ धृ॥ अहा कोपली भारतमाता । वेद गाती महिमा जीचा । खास नाश हो त्रिदशां शरण न जाता तीस ! ॥१॥**

( जातात )

---

## प्रवेश २ रा

( अमरावतीच्या नदी किनाऱ्यावरील रस्ता )

### ( मालविका व माधविका )

**मालविका**--कुणाचं ग विमान होतं ? धडपडली होतीस एवढी पहायला तें !

**माधविका**--मालविके ! त्याचं ग तुला एवढं असं काय वाटलं ! त्या विमानाचा घंटारव इतका सुंदर होता कीं, मला तें अगदीं अपूर्वच वाटल्या-सारखं झालं ! बघ तें तों श्रीविष्णूचं गरुडविमान ! मला वाटलं तें क्षीर सागराकडेच जात असेल पण त्या जवळच्या आमराई जवळच्या मैदानावरच तें उतरलं ! श्रीविष्णू असते त्यांत तर राजमहालांत नसतं का एकदम विमान गेलं !

**मालविका**––चलतेस का? बघूंच कोण आहे त्यांत ! कदाचित् भूलो-कावरचा पुण्यवान् स्वर्गाला आला असेल त्यांतून ! पण गडे, प्रत्यक्ष महाविष्णूंचं गरूडविमान ज्याच्याकरितां धाडल जातं तो पुरुष महेंद्रांच्या पेक्षांहीं जास्त–योग्यतेचा समजला जातो हें तूं ऐकलं असशील !

**माधविका**––माझी आई सांगत असते, भूलोकावर असला एक एक पुण्यवान महात्मा अवतार घेत असतो कीं, त्यांच्या पुढं आमच्या इथं–केव्हां केव्हां येणारे अगदीं ठेंगणेच दिसायचे ! मला वाटतं माधविके, एकदां मृत्यु लोकीं जाऊन यावं ! पहावं तो लोक कसा काय आहे !

**माल०**––मग कसली येतेस तूं परत ! आई सांगत होती ना स्वर्गलोकच्या अप्सरा मृत्यु लोकाला गेल्या म्हणजे तेथल्या एखाद्या सुंदर पुरुषाच्या प्रेमपाशांत सांपडतात व मग त्यांना तेथल्या सुखापुढें स्वर्गसुख देखील तुच्छ वाटतं !

**माध०**––आणि इथं तरी असं कोणतं सुख आहे खरं म्हटलं तर ? जो येईल त्याचं मनरंजन करायचन् आयुष्य घालवायचं हेंच कीं नाहीं ? मला तर खरोखर कंटाळा आला आहे इथल्या या भानगडीचा ! चलतेस तू माझ्या बरोबर ?

**माल०**––मी आपली इथंच बरी आहे ! मृत्युलोकीं अमृत कुठं आहे नित्यशः पान करायला ? इथं जराहि नाहीं आणि मृत्युहीं नाहीं ! सांगितलेलं काम करायचं आणि आनंद करायचा ! मृत्युलोकावर फार प्रसन्न दिसतेस ? माधविके हें बघ ! इथल्या कांहीं जणांचा स्वर्गवासाचा काल संपला असून ते परत मृत्युलोकाला जायला लौकरच निघतील ! जातेस त्यांतल्या एखाद्या बरोबर ! शची महाराणींना सांगून, देतें तुझीहि रवानगी करून ! मला वाटतं असं कर–माधविके ! हा कुणी गरुडविमानांतून आला आहे ना ? याच्याच सेवेंत रहा आपली तूं ! अग आमच्यापैकीं कुणाला तरी तें काम करावं लागणार आहे का नाहीं ? मग तूंच मागून घे तें. ह्याचा पुण्यसंचय संपला म्हणजे–संपणारच स्वर्गांत कांहीं नेहमी रहायला स्थान नाहीं–तो जेव्हां परत जाईल तेव्हां तूंही–हुः ! पण ( हंसत ) तो इथं आहे तोंवर त्यांना चांगलं प्रसन्न करून घे हो !

**माध०**––चाहाटळ आहेस झालं ! मी म्हणतें तसं झालं म्हणून काय झालं ? इथल्या अप्सरांचे संबंध जसे कांहीं भूलोकीं झालेच नाहींत वाटतं ?

इथं सगळे देव आणि तिथं सारे असुरच असतील नाहीं ? असा एखादा महात्मा जर भेटला तर त्याची सेवा करण्यांत पाप का लागणार आहे?

**माल०**--( हंसून ) अग पण मी कुठं ह्मणतें पाप लागतंय ह्मणून ? नुसती सेवा करण्यापेक्षां पाति म्हणून सेवा केलेली आणखी बरी असं माझं म्हणणं ! तूंच ह्मणत होतीस ना कीं, मी इथल्या या जिण्याला कंटाळलें आहे ह्मणून ? बाकी स्वर्गसुखाला कंटाळलेली तूंच एक पाहिली आहें मी ! स्वर्ग मिळायला मृत्युलोकचीं माणसं नानाप्रकारचीं तपाचरणं करितात आणि पूर्वपुण्याईनं अखंड प्राप्त झालेला स्वर्गवास सोडायची तुझी इच्छा होते.

**माध०**--अग, सुखाला लाचावलेला मनुष्य आपल्या सुखांत यत्किंचित अंतर पडूं नये याची फारच काळजी घेत असतो. फार काय पण आपल्या सुखाच्या आड येणारा कुणी यांना दिसला तर त्यांच्या मागें लागून त्याला होता का नव्हता असं सुद्धां करून टाकतात हे राक्षस ! सांग बरं ! भूलोकावर एखादा पुण्यवान् मनुष्य तपाचरण करूं लागला तर आपल्या इंद्रमहाराजांना लगेच आपलं सिंहासन-डळमळायला लागल्यासारखं कां वाटतं ? त्यांच्या पुण्यकर्मास व्यत्यय आणण्याची रात्रंदिवस हें कां खटपट करितात ? आह्मांला उगीच नाहीं गोंजारून ठेवलं यांनीं ! त्यांच्या सुखांत व्यत्यय येऊं नये ह्मणून आम्हां अप्सरांना अत्यंत सुखांत ठेऊन आयत्या वेळीं हस्तकाचं काम करवायचं व आपण आपली अब्रू राखायची असाच स्वर्गलोकचा इतिहास आहे नाहीं ?

**माल०**--बाई ! बाई ! ! माधविके ! अग महाराजांचा द्रोह करींत आहेस बरं तूं अशा भाषणानं ! देवेंद्रांच्या विरुद्ध असलं भाषण त्यांच्या आश्रितांच्या तोंडून ? हे जर महाराजांना आणि राणीसाहेबांना कळलं तर- ?

**माध०**--कळेना का ? मी बोललें तें खोटं आहे का ? महाराजांना क्रोध आला तर काय करतील ? मृत्युलोकावर शाप देऊन रवानगी करतील हेंच की नाहीं ? पाठवा ह्मणावं ! मी तेथें जाऊन अशी तपश्चर्या करते कीं यांच्या सिंहासनाचं संरक्षण माझ्यापासून यांना करितांच येणार नाहीं ! हा बघ आला आहे एक महात्मा ! ( हात जोडून ) कोणी कां असेना, श्रीमहाविष्णूंचं गरुडविमान त्याला घ्यायला धाडलं त्याचं पुण्य न् इंद्रमहाराजांचं पुण्य यांची तुलनाच कशाला हवी ? भूलोकचा तो महात्मा देवेंद्रांच्यापेक्षांही मला श्रेष्ठ वाटतो !



**भारतमात.ः**—जा त्याला सांग, भाग्यश्री भारतमाता आली म्हणून.

**माल०**––शर्थ झाली बरं तुझी माधविके ! तुझ्या अंगांत आज कसला ग संचार झाला आहे ? तूं तर अगदीं वारेमाप बोलायला लागलीस ! अग देवेंद्रानीं शाप दिलान् कुठं मगरी म्हणून समुद्रांत अडकून ठेवलं तर ?

**माधा०**––शापाची मला नाहीं वाटत भीती ! मी शंभर जन्म घेईन पण हें पापी जिणं सहन करणार नाहीं ! पुण्यवंतांच्या तपाचरणांत विघ्न आणणाऱ्या पाप्यांच्या कार्याची मी हस्तक बनणार नाहीं ! समजत नव्हतं आजवर तें ठीक झालं ! कसंही करून मी मृत्युलोकीं जाणार व या तुमच्या स्वर्गापेक्षांही जेथें श्रेष्ठ स्थान असेल तेथलं साम्राज्य हस्तगत करणार ! देवेंद्रानं माझ्यासमोर वाकलं पाहिजे इतकी मोठी होणार मी !

**माल०**––( स्वगत ) काय झालं आहे इच्या डोक्याला ? तें विमान पाहिलं तेव्हांपासून जणूं काय वारंच भरलं आहे ! आतां काय करावं ! महाराजांच्या कानीं जर हें गेलं तर फार दुर्दशा होईल हिची ! ( उघड ) माधविके ! बोलूं नये बाई असं देवेंद्राविरुद्ध ! किती झालं तरी ते राजे आहेत ! आपण त्यांचे सेवक आहोंत ! आपल्याकडून सेवा घेतात त्यांचा पुरोपूर मोबदला नाहीं का देत आपणाला ?

**माध०**––सेवक झाला म्हणून त्यानं आपले विचारही विकले वाटतं ? आणि मालकानं सुद्धां त्याच्याकडून पुण्यकर्म कां नाहीं करवूं ? ह्याच्या पुण्यकर्मांत व्यत्यय आण, त्याच्या तपाचा भंग कर, त्याला प्रेमपाशांत डांबून ठेव, त्याचं वाटोळं कर, असलीं पापी कामं करविण्याकरितांच जर देवेंद्रांनीं हें एवढं नोकरांचं खिल्लार बाळगलं असेल व त्यांना आपल्या बरोबरीचीं सुखं प्रदान केलीं असतील तर तें केवळ खुनशीपणाचं काम असून देवेंद्रासारख्याला शोभत नाहीं ! मालविके ! मला क्षमा कर ! मला या जिण्याचा वीट आलेला आहे !

( इतक्यांत भारतमाता येते )

**भारत०**––काय ग पोरींनो माझा बाळ आला आहे कां इथं ?

**माल०**––कोण तुमचा बाळ ! स्वर्गाची वाट बरीच सुलभ झालेली दिसते ! इकडं नाहीं आला तुमचा बाळ का कोण तो !

**माध०**––मालविके ! अशी मत्त होऊं नकोस ! स्वर्गसुख लाभल्यामुळं आलेला उन्मत्तपणा या देवतेसारख्या एखादीच्या शापानं दडपला जाऊन

त्याबरोबर तुझा स्वर्ग एकदम गडबडून खालीं कोसळेल ! पहा ! ह्या देवतेकडे पहा ! ही अनन्य साधारण मूर्ति कोण असावी ह्याची साधी चौकशी न करितां वेशीवरच्या एखाद्या पहारेकऱ्याप्रमाणं तिची अवहेलना करणं हें कृत्य देवांना शोभणार तर नाहींच, पण राक्षसांच्या हातूनसुद्धां असलं कृत्य व्हावयाचं नाहीं ! आई ! आपण कोण आहांत ? कुठून आलांत तुम्ही ?

**माल०**——भरलीं बरं हिचीं बारा वर्षं ! स्वर्गांत इतका पेंचपांच कुठला असायला ? एक जात सुख नाहीं तर विरोध ! सुखाचं शिखर—गांठलं एकदां म्हणजे खालचा देव जरी आला तरी त्याच्याशीं काय करायचं आहे ! ही स्वर्गाची वाट मृत्युलोकच्या लोकांना कुणीं मोकळी ठेवली कुणाला माहित ! उगीच त्रास होतो आहे कां नाहीं ? ही कोण एक बया आली आहे आणि आमची माधविका लागली आपली तिला देवता म्हणायला ! नुसता मुगुट ठेवला डोक्यावर म्हणजे देवता झाली काय ? आणि सगळ्या जगानं कुणालाही देव म्हटलं म्हणून आमचा स्वर्गलोक थोडाच त्याला भीक घालणार आहे ! माधविके ! तूं बैस बोलत हिच्याशीं वाटेल तर ! मी जातें कशी !

**भारत०**——कोण ग तूं ? मला ओळखलं नाहींस वाटतं ? मेल्यानों ! माझ्या दुःखद प्रसंगीं माझी थट्टा करितां होय ? बाळा ! तुझ्या जाण्यामुळं वाटेल त्या पायींच्या पैजारानं माझी थट्टा करावी अशी पाळी आली आहेरे ! कुठंरे आहेस तूं ?

**माल०**——स्वर्गलोकच्या सीमेंत रडारड नाहीं उपयोगाची ! इथं एकजात हास्य पाहिजे ! रडलीस तर घालवून दिली जाशील ! कुणी का असेना !

**माध०**——मालविके ! शेफारूं नकोस ! हिच्या नेत्राकडं पहा ! त्यांत पाणी खंडून एकवार तुझ्याकडे रागानं पूर्ण उघडलेले दिसूं दे कीं त्या क्षणींच तुझ्या स्वर्गाला आग लागेल ! हा तुझा सुखाचा डोंगर पाताळाच्या खोल दरींत जाऊन गडप होईल ! भल्या माणसांना सत्त्वस्थांना दुःख दिल्याचं पातक कुलक्षय करीत असतं बरं ?

**भारत०**——माझी बाळी खरीच शहाणी दिसते ! मुली ! माझ्या बाळाचा कांहीं पत्ता लागेल कां ग ? इकडंच आला असेल असं नारद म्हणाला ! शोध करून येतो म्हणाला तो कसला येतो ! त्याच्यामागं अनेक भानगडी !

मींच निघालें इकडे ! हा स्वर्गच ना ग ! इथंच आला आहे माझा बाळ ! दाखवितं कां मला तो कुठं आहे तें !

**माध०**––आई, आपण कोण आहांत हे कृपा करून मला सांगाल काय ? आणि आपला बाळ ?––

**भारत०**––मी–मीं–( स्फुंदून ) मी एका काळीं साऱ्या विश्वाची स्वामिनी होतें ! माझं वैभव–मुली ! तुला काय सांगूं–गेल्यामुळं मी हल्लीं वनवासी झालें आहें ! मुली ! मी भारताची जन्मदात्री असून नुकत्याच काळानं हिरावून नेलेल्या माझ्या बाळाचा शोध करीत इकडे आलें आहें.

पद–( चाल:–मनकामना होई )

**वनिता मना कांहिं माना । भेटवा हो सुमन सुमना । माय‑लोभ दावुं भावना ! ॥ ध्रु० ॥ नाहि वास सुमिं । नच सरोज नीरीं । नाहीं जरि पुत्र पोटि । दैव हरि जइं सुता । माय हीना ! ॥ १ ॥**

**माल०**––हरवलेला जिन्नस परत मिळविण्याचं हें स्थान नव्हे म्हणून सांग ना ग माधविके! कंटाळलें बाई मी तुझ्या सहवासांत ! कळवलंच पाहिजे मला महाराजांना हें सारं ! तिला सांग भलोकावरचा वाटेल तो उपटसुंभ इथं येत नसतो नि लाव परत !

**भारत०**––उत्मत्त पोरी ! कुणी ग हा स्वर्ग ह्या दशेला आणला ? स्वर्गाचे मिरासदार तुम्हीं ग कुठले ? तुझा इंद्र सुद्धां माझा पुत्र आहे ! जा त्याला सांग भाग्यश्री भारतमाता आली आहे म्हणून !

**माध०**––( पाया पडून ) अहाहा ! मातुश्री, तुमच्या दर्शनानं मी पावन झालें ! तुमच्यावरच पोसलेले स्वर्ग लोकचे देव ऐषआरामांत इतके चूर झालेले आहेत कीं ते कदाचित् आपणाला ओळखणार सुद्धां नाहींत ! मातुश्री ! आपला बाळ कोण बरं ?

**भारत०**––माझा बाळ ! –माझा भाग्यतिलक ! ––माझा वीरश्रेष्ठ बलवंत, तुझ्या परिचयाचा नसेल ! जगांतला एक अद्वितीय विद्वान, भगवंताच्या गीतेचा एकनिष्ठ उपासक, कर्मयोग मंत्राचा आद्य प्रणेता––( रडत ) आपल्या तपःसामर्थ्यानं इंद्राच्या हृदयांत धडकी भरविणारा माझा बलवंत––

किती ग गुण गाऊं माझ्या लाडक्याचे--तो इथंच आला असेल ! सांग, कांहीं पत्ता लागेल का त्याचा ?

**माल०**-- [स्व.]गरूडविमानांतून आलेला तोच तर नसेल हिचा बाळ ? महाराजांना वर्दी दिली पाहिजे याची लौकर ! नाहीं तर गोंधळ व्हायचा ! माधविके ! जातें मी ! बाईसाहेबांची स्नानाची वेळ झाली ! तूं बैस आपली इथं या बाईशीं बोलत ! ( जातां जातां ) यांची पर्वा केली ह्मणजे स्वर्ग जायचा हातचान् मग कुठलं सुख नि आनंद ?

**माध०**--मानवीअंतःकरणांत पाषाण शिरायला अनिवार सुख-लालसा हें एकच कारण आहे ! मातुश्री, हिच्या बडबडीकडे आपण लक्ष देऊं नका ! तुह्मीं चला माझ्याबरोबर ! आज इथं गरूडविमानांतून एक महात्मा भूलोकाहून आला आहे ! बहुधा तोच असेल आपला बलवंत !

**भारत०**--( आनंदून ) चल माझी गुणाची बाई ती ! बाळ ! स्वर्गाच्या बेपर्वाईच्या भांगेंत तूं तुळसच आहेस ! चल, तुला माझ्या बाळाला भेटवतें ! त्याची एक एक गोष्ट ऐकशील तर तुला त्याच्या जवळून दूर जावंसंच वाटणार नाहीं. माझ्या लोकीं राजाला देखील लाभणार नाहीं असा सन्मान त्याला सारे लोक देत असत. चल जाऊं आपण तिकडं ( जातात. )

---

## प्रवेश ३ रा

( **स्थल**:-अमरावतीच्या जवळची आमराई )

**लोकमान्य**:--( खालीं पाहून ) माझ्या भारतदेशा ! दुर्दैवानं तुझी माझी ताटातूट इतक्या लवकर कां बरं झाली ? तुला वैभवाच्या दारांत निदान नेऊन बसवावं इतकी माझ्या मृत्युलोकच्या जीवनाची आशा होती तीदेखील काळानं पुरी होऊं दिली नाहीं ! माझ्या प्रियदेशा ! माझ्या लाडक्या भारत माते ! माझी भली-बुरी सेवा तुझ्या चरणीं रुजू झाली ना ? मी खरंच सांगतों मला या प्रदेशांत कसंसंच वाटतं ! माझा मायदेश दुःखानं तळमळत असतांना, गोपालकृष्णा ! मला स्वर्गाच्या आनंदांत तूं कां आणून टाकण्याचं मनावर घेतलंस ! मला आपलं स्वतःचं गरुडवाहन देण्यांत जें प्रेम तूं दाखविलंस तेंच प्रेम तीच कृपा, देवाधिदेवा ! माझ्या कार्यांत यश देण्यांत तूं दाखविली अस-

तीस तर तुझ्या दयेचे पोवाडे मोठ्या आनंदानं कोट्यवधि लोकांनीं गाइले असते ! ज्या भूमींत माझा जन्म झाला तेथेंच माझा स्वर्ग ! देवा ! पाठीव मला परत माझ्या पवित्र देशांत ! अहाहा ! उगवत्या स्वराज्याच्या अरुण प्रभेनं माझ्या देशबांधवांच्या मुखावरील म्लानता नुकतीच कुठं निघायला लागली होती तोंच—छे ! दुःखाला दुःख म्हणणं मला माहित नव्हतं. पण स्वर्गाच्या पंचक्रोशीच्या आंत पाऊल टाकल्याबरोबर मी दुसऱ्याच्या तावडींत जाऊन हताश होण्याच्या तावडींत मी सांपडलों ! कोसळणाऱ्या आभाळाला "ये" म्हणून म्हणणारं माझं हृदय, परत जाणं माझ्या हातीं नाहीं म्हणून दुःखानं व्याप्त होतं ! भगवंता ! तुझ्या मनांत आहे तरी काय ? ( गीतारहस्य वाचायला लागतात. ) ( मालविका येते. )

**माल०**—हाच तो महात्मा गरुडवाहनांवरून आला म्हणून मला विमानरक्षकानं सांगितलं ! याच्या तोंडावरून तर याला स्वर्गप्राप्तीचा आनंद वाटतोसा दिसत नाहीं ! कांहीं कांहीं तर मेले असे येतात कीं सदा सर्वदा हिरमुसलेलेच ! देवाला देखील कांहीं कळत नाहीं ! असल्या वैराग्याकरितां विमान पाठवितात ! याच्याकरितां तर स्वतःचं गरुडविमान पाठविलं ! इश्शः कसला तरी बाई चेहरा ! केव्हडाल्या त्या मिशा ! डोकीवरल्या केसांचा तर फारसा पत्ताच नाहीं ! अंगावर कुठं एक फुटका मणि देखील दिसत नाहीं ! डोळे बारीक पाणीदार आहेत. पण जरा क्रूरच आहेत ! असलं हें ध्यान इथं राहणार आणि आम्ही अप्सरा यांची सेवा करणार ! माझ्यावर पाळी येऊं द्यायची नाहीं मी ! देईन लावून माधविकेला ! तिला आवडतात असलींहीं माणसं ! माधविकेला सांगून निघालें तों इकडनंच सगळा खुलासा करून घेऊन महाराजांच्या कानावर सारं घालावं येवढ्या करितां इथं आलें ! विमानरक्षकही नदीवर विश्रांति घेत आहेत ! कोण कोठले विचारलं पाहिजे ! ( उघड ) गरुडविमानांतून आलेले आपणच का ?

**लोक०**—होय ! ( स्वगत ) ग्रंथातलं स्वर्गाचं वर्णन किती तरी अपुरं आहे !

**माल०**—म्हटलं आपलं नांव ?

**लोकमान्य०**—( स्व० ) झाली चौकशीला सुरवात ! स्वर्गाच्या हवेंत नुसतं शिरल्याबरोबर इतकी बारिक चौकशी होत असते तर ? आमच्या येथले

चौकस लोक बहुधा एक वेळेला तरी स्वर्गाला जाऊन आले असावे ! ही पिडा बहुधा लौकर टळणार नाहींस दिसतय. पण बंघू या !

**माल०**--आपलं नांवगांव कळविण्याची कृपा होईल काय ? मी महेंद्राच्या विश्वासांतली अप्सरा आहें !

**लोक०**--मला बलवंत ह्मणत असत आमच्या लोकांत. ( स्व० ) महेंद्राच्या विश्वासांतलं कुळ आहे हे अँ ! महेद्रांना आपलं आसन डळमळायची फारच भीति वाटते एकूण ! ( उघड ) महेंद्रांचा कांहीं हूकुम आहे का मला? महेद्रांना सांगा माझ्याकडून त्यांना कांहीं भीति वाटून घ्यायला नको !

**माल०**--भीति कसली ह्मणा ! महेद्रांना कसली भीति ? राजे लोकांना भीति ठेऊन कसं चालेल ! आपण आलांत तरी त्यांचं सिंहासन थोडंच घेणार आहांत ! राहाल चार दिवस न् जाल परत ! काय म्हटलंत आपल नांव ?

**लोक०**--( हंसून ) बलवंत ! मी पुण्य पत्तनांत रहात असें !

**माल०**--काय पुण्यपत्तन ! आहे काय आमच्या स्वर्गपुरी एवढं ! तिथं अमृत तर नाहींच ! मग तुह्मीं पितां काय तिकडं ?

**लोक०**--या बाईला आतां मला भूगोल शिकवावा लागेल का काय ही भीति पडली आहे ! असो इलाज नाहीं ! ( उघड ) कसलीं--आमची भूलोकचीं पुरं घेऊन बसलां आहांत तुह्मीं ? भूलोकीं अमृत कुठलं लाभायला ! त्यावर तुम्हीं स्वर्गातल्या लोकांनीं आपला हक्क ठेवला नेहमीं आह्मीं पाणी पितों पण स्वर्गांतून उतरलेल्या कांहीं महात्म्यांच्या कृपेनें आमच्या लोकांत मदिरापान सुरू झालं आहे ! शुक्राचार्यांचा शाप देखील फलद्रूप होत नाहीं !

**माल०**--मदिरापान होय ! सोमपानासारखंच्च कांहीं आहे काय तें ? खरंच आहे ! स्वर्गांतून खालीं गेलेले महात्मे ! सोमपानाची संवय झालेले ! तुम्हीं नाहीं आणलीत थोडी मदिरा आपल्या बरोबर ! बघितली असती आम्ही थोडी घेऊन.

**लोक०**--बाई ! मी आपला पाणी पिणारा गरीब ब्राह्मण होतों त्या लोकांत !

**माल०**—गोड असते कांहो ती? आमच्या इथल्या अमृताच्या सारख्या तिथं मदिरेच्या पुष्करणी भरल्या आहेत का?

**लोक०**––( स्व. ) स्वर्गातल्या रिकामटेंकड्या लोकांना थंड हवेंत बसून असाच काळ घालवायची संवय दिसते ( उघड ) बाई! मी शपथपूर्वक सांगतों मी मदिरेला स्पर्शसुद्धां केला नाहीं! मग मला तिची चव कशी कळणार? बाकी तुमच्या कृपेनं आमच्या इथं मदिरेच्या नद्या वहायला लागल्या म्हटलं तरी कांहीं खोटं म्हणतां येणार नाहीं!

**माल०**––म्हणजे मृत्युलोकचं तुम्हांला आमच्या इतपतच ज्ञान आहे म्हणायचं? आणखी तिकडची एखादी अपूर्व वस्तू आहे का तुमच्याजवळ?

**लोक०**––ही माझी पगडी आहे. मला वाटतं अपूर्व तुमच्या इथं शिवाय–( स्व० ) मोठी मुष्किल केली आहे या बाईनं. इथलं चौकशीखातं चौकस असलं तरी अगदींच गचाळ आहे! मुद्याच्या गोष्टी सोडून बाकीं सगळं चौकशींत विचारीत असतात. ( खिशांत हात घालून ) ( उघड ) मला वाटतं ही सुपारी अपूर्व आहे तुमच्या इथं!

**माल०**–– ( मोठ्यानं हंसून ) स्वर्गाचं तुम्हांला अगदींच ज्ञान नाहीं झालं! अहो आमच्या इथं सुपारीच्या केंवढाल्या तरी बागा आहेत! इथं तांबूल भक्षणाला अमृत पानाइतकंच महत्व आहें! दिसेलच तुम्हाला तें सारं लवकरच!

**लोक०**––मी फक्त सुपारी खात असतों! तांबूल भक्षण बहुधा मी करीत नाहीं!

**माल०**––मग स्वर्गाला कशाला आलांत! बघा तर देवेंद्राला माझ्या हातचा तांबूल फार आवडतो!

**लोकमान्य०**––आमच्या लोकीं सुद्धां तांबूलभक्षणाला फार मान आहे. मदिरेचं लालपाणी पिऊन झाल्यावर तर तांबूलभक्षण केलंच पाहिजे अशी त्या लोकांत चाल आहे!

**माल०**––अगदीं आमच्या इथल्याप्रमाणंच! वा! भूलोक इथून अगदीं जवळच आहे वाटतं! इथल्या सारखा सारा आनंदीआनंद असेल नाहीं तिथं!

**लोकमान्य**--( उसासा टाकून ) आनंद ! बाई ! आनंदाला आम्ही आज कित्येक शतकें पारखे झालों आहोंत ! मनुष्य स्वतः आनंदांत असला म्हणजे त्याला सारे आनंदांत आहेत असं वाटतं. पण आपल्या आनंदांतून निघून दुसऱ्याच्या दुःखाशीं समरस होऊन त्याचं दुःख हलकं करण्याचा एखादाच प्रयत्न करीत असतो ! बाई ! तुम्हांला काय सागूं, माझा मायदेश " सूवर्णभूमि " या नांवानं संबोधला जात होता व त्याची शोभा पहायला देवेंद्रांना देखील विमानांतून बसून तिकडे येण्याची इच्छा होत असे. पण आतां- . . . .

**माल**०--अहो रडूं नका ! स्वर्गलोकीं कोणी रडत नाहींत !

**लोक**०--इथं कोणी रडत नाहींत म्हणून इथल्या कोणाचं आमच्याकडे लक्ष लागत नाहीं ! भगवंता ! मला रडत इथं आणण्याचा तुझा हाच तर हेतु नसेल ना ?

**माल**०--अरेरे ! तुम्हांला फार दुःख होत आहे ! तुमच्या लोकची एक बाई इथं आपल्या बाळाचा शोध करायला नुकतीच आली ! तीही अशीच सारखी रडत होती " माझा बाळ ! माझा बाळ ! ! " म्हणून सारखा आक्रोश चालविला आहे तिनं ! जरा वेडाची लहरही दिसली मला तिच्या चेहऱ्यावर ! वेडी नाहीं तर काय ? ती आपणाला त्रिलोकाची राणी म्हणवीत होती व आमच्या राणी साहेबांच्या सारखा किरीटही घातला होता तिनं डोक्यावर ! आमची माधविका लागली आहे तिच्या नादीं ! असं उदासवाणं नका राहूं ! इथं आहांत तोंवर इथलीं सुख भोगा मग आहेच रडणं असलं तुमच्या नशिबांत ! अमरावतींत आल्यानंतर भेटेन मी तुम्हांला ! आनंदी असा चांगले ! येतें मी अँ ! ( जाते )

**लोकमान्य**--परदुःख शीतल ह्मणतात ते कांहीं खोटं नाहीं ! ही चिमुरडी मला ज्ञान शिकवते. कां तर ही सुखांत आहे ! ' ज्याच्या हातीं ससा तो पारधी " आम्हां दुर्दैवी हिंदवासीयांच्या रडण्याला हसणारे लोक केवळ स्वर्गांतच आहेत असं नाहीं ! स्वसुखाच्या आनंदांत गर्क असतांना ऐकूं येणारा करुणस्वर त्यांच्या आनंदाच्या अगर अपमतलबाच्या वातावरणांत इतका मिसळून जातो कीं आपल्या सारखंच सारं जग सुखी आहे असा सिद्धांत हे विषयलोलूप ठोकून देतात ! ( विचार करून ) कुणी बाई आपल्या बाळाचा शोध

करीत इथं आली असं हिनं सांगितलं !–त्रिलोकाची राणी म्हणवीत होती–माझी भारतमाता मूर्तस्वरूपांत आली असेल काय ? माझ्याकरितां ती इथं आली असेल काय ? कुठं गेली म्हणत होती ? मातुश्री, या तुमच्या बाळाला क्षमा करा ! माझा नाइलाज झाला त्याला मी काय करूं ! काळाचे अनेक कठोर प्रहार सहन करून मी जीर्ण झालों असतांना वर्मी आघात झाला तरी मातुश्री ! आपल्या पायाशपथ आपलीच मूर्ती माझ्यासमोर होती ! मृत्युसमयीं माझ्या नेत्रांतून होणारा अश्रुपात केवळ आपल्या सेवेला मुकलों म्हणून होत असलेल्या दुःखाचाच होता ! गणगोत, इष्टमित्र किंबहुना सर्वस्व मी आपल्या पायांवर वाहिलं होतं पण कृतांतापुढं माझा नाइलाज झाला ! आई ! आपण घाबरूं नका ! मोहनरायांनीं आपल्या सेवेचं कंकण बांधलं आहे ! आणि मीहि आपल्या वांचून राहात नाहीं ! मला स्वर्गातच डांबून ठेवण्यांत आलं तर आपल्या कृपेनं सारा स्वर्ग आपल्या कहाणीनं दणाणून सोडीन व वेळ पडल्यास प्रत्यक्ष भगवंताला आपल्याकरितां अवतार घ्यावयास लावीन.

( पडदा पडतो )

---

## प्रवेश ४ था

( देवेंद्राचा महाल )

( देवेंद्र आणि शचि सारीपाट खेळत आहेत )

**शची**––आपल्या सोंगट्या अजून कच्याच आहेत बरं का ! माझा डाव पक्का व्हायला आला आहे ! माझा फांसा आज कसा अगदीं हुकमी पडतो आहे !

**इंद्र**––आपला फांसा आजच काय पण जेव्हां पडायचा तेव्हां हुकमीच ! आह्मी जंग पछाडले तरी आमचा डाव हा कच्चा राहणारच ! बघा डाव पलटवतो आतां ( खेळून ) कच्चे बारा !

**शची**––( हंसून ) येऊं द्या सोंगटी अशी माझ्या समोर ! खेळायला जागाच नाहीं ! साऱ्या पटावर माझ्या पक्क्या सोंगट्या वावरत आहेत !

**इंद्र**––ह्मणजे माझं स्वतंत्र अस्तित्व नाहींच वाटतं ! स्त्री–पुरुषांच्या खेळांत नेहमीं हे चालायचंच ! तुम्ही त्याला सर्व बाजूंनीं बांधून टाकून त्याला

आपल्या कबजांत अश्या डांबून ठेवतां ! खेळा तुम्ही. मी बघतो फांसा कसा पडतो तें !

**शची**--( हंसून ) एकीकडे पराजय कबूल करायचा न् दुसरीकडे ( खेळते ) पोबारातेरा ! उचला आपली ती सोंगटी. आहेना हुकमी दान ?

**इंद्र**--आहे खरंच ! आतां खरंच पोबारा करायची वेळ आली आहे ! माझी सोंगटी तुझ्या पुढं आली कीं, गळाठलीच ! हरकत नाहीं ! (खेळून) दशदोन बारा !

**शची**--यापुढं आपणाला सोंगटी ऋजु नाहींस दिसतं ! फांसाही अगदींच अडाणी ! आज त्यानं आपणाला पुरं फसवायचं मनांत आणलेलं दिसतं ! आता मी मुळीं तुम्हांला धीर येईल असाच डाव टाकतें अं ( खेळते) दसप्यादा

**इंद्र**--( चिडून ) अग तूं सहज खेळ अगर कशीही खेळ तुझा डाव हुकमी पडायचाच ! ही बघ गळाठली ही माझी दुसरी सोंगटी ! (पट उडवून) नाहीं खेळत मी आतां ! एक सुद्धां डाव हुकमी नाहीं म्हणजे काय ? खेळांत झालं तरी तुझंच वर्चस्व ! आतां उद्यां नवे फांसे, नव्या सोंगट्या, नवा पट आणवितों न्--

**शची**--सारं कांहीं नवं आणविलं तरीं दान पडलं पाहिजेना नवं ! जरा करामत लागते खेळण्यांत ! हेंही एक बैठं युद्धच आहे ! तें नाहीं साधायचं इकडं ! एखादी साधी स्त्री हरवील आपल्याला त्यांत ?

**इंद्र**--कबूल आहे ! वज्र पेलणारे हात व नेहमीं फुलांशीं खेळणारे कुसुमकोमल हात यांत फरक असणारच ! उद्यां आपण बघाल कशी करामत करतों ती ! वज्र पेलणारा हात प्रसंगीं नाजूकही होतो हें दाखवीन मी तेव्हां. हुश्श ! ! जरा मनरंजन झालं पाहिजे ! नृत्यगायन होऊंद्या थोडं !

**शची**--मालविके ! माधविकेला नि वासंतिकेला आण बोलावून ! अमृतपानाचं साहित्यही आण लवकर ! ( मालविका जाते )

**इंद्र**--हा खेळ जरा खेळायला लागलं कीं, मला करमणूक केव्हांच होत नाहीं ! उगीच तुझ्याकरितां खेळत असतों झालं !

**शची**--माझ्याकारितांच ना ? आणि माझ्यामुळं इकडच्या जीवाला त्रास होतो ! (हंसून) उद्यांपासनं कीनई, मी सारे डाव आपल्याला अनुकूल

असेंच खेळत जाईन. पण गडे एकवार पैज लावून खेळूं या आपण ! मग सारीपाट अजीबात बंद !

**इंद्र**—तुला व्यसनच लागलं ह्मणायचं या खेळाचं ! आणि व्यसनाची पराकाष्ठा जशी उन्मादावस्थेंत विलीन होतें तसं व्हायला लागेल तुला लवकरच !

**शची**—खेळांत कसलं आलं आहे व्यसन् न उन्माद ?

**इंद्र**—या खेळाचे प्रताप ध्यानांत नाहींत वाटतं तुझ्या ! कैलासनाथ आणि देवी पार्वती यांच्या खेळाचं पर्यवसान अखेर कशांत झालं ? खेळांत बायका नेहमीं करामत करून पुरुषांच्या अंगावर बाजू ढकलून द्यायच्या व मग 'जितम्' म्हणून त्यांची हेटाळणी करायची व त्यांचा नसता छळ करायचा !

**शची**—तो एक देवांचा खेळच होता त्यांतही मौजच होती !

६ पद (चालः—जाया का.)

**क्रीडा ही बरवीं सुरां। प्रीती अंत करी जरा। कुसुमित चाप होइ सहकारी। डाव विफल होतां। जरि रुसला पति येइ घरा॥१॥**

**इंद्र**—विजयी पक्षाला मौज वाटण्यासारखा तो प्रकार खराच ! स्त्री-बरोबर पैज लावून द्यूत खेळणं मला तर बरं वाटत नाहीं ! डाव हुकतोच नेमका ! तुमचं चरित्र अगम्य आहे !

**शची**—(हंसून) मी नाहीं आपणाला जिंकणार ! मग तर झालं ना ? एवढी भीति का वाटते इकडं माझी ? आपणच डाव टाका दोन्ही ! माझ्या-करितां व स्वतः करितां ! मग तर नाहींना आरोप यायचा माझ्यावर ?

**इंद्र**—उंः हुंः ! तुमची नुसती नजर बस्स आहे आमच्यावर डाव उलट-वायला ! त्या नजरेंतच जादू आहे ! तिथं विद्युत्‌शक्ति आहे ! तिथं तारतम्याची मात्रा चालायची नाहीं ! विजयाचं पाणी त्याच्यांत नैसर्गिक खेळत असल्या-मुळं त्याच्या धुंदींतच ते प्रतिपक्षाची उडालेली गाळण पाहण्याच्या आनंदांत उचंबळत असतात ! निसर्गापुढं मी काय न् शंकर काय, संसारी काय न् वैरागी काय बारगळायचेच !

**शची**—(मोठ्यानं हंसून) बघूंया काय होतंय तें ! आतांच खेळूं या नाहीं तर ! उगींच खोट्या पैजा लावून खेळूं म्हणजे झालं ! (सारीपाट—मांडू लागते) नाहीं जिंकित म्हणतें ना ? आज आपली वृत्ति अशी काय म्हणून झाली आहे ?

( सारीपाट फेंकून ) झालं ना आतां ! एवढ्याश्या गोष्टीकरितां एवढं वाईट वाटून घ्यायला कशाला हवं ? आतां—हंसायचं गडे एकवार ! नाहीं तर बोलायचीच नाहीं अगदीं इतःपर !

**इंद्र**—हेंच तें तुमचं अस्त्र ! एवढ्यांत सारं जग गार होऊन जातं ! पुरुषांशीं तुम्हीं बोलायचं नाहीं असं ठरवलं तर जगाची वाचा बंद होईल ! पृथ्वीचं जिणं जड होऊन जाईल ! ह्या तुमच्या प्रेमाच्या धमकींत मोठमोठाले वीर गारद होतात असं तेज आहे त्यांत ! [ हंसून ] ईश्वरानंच जेतेपणाचा मान तुमच्याकडे दिलेला असल्यामुळं नुसत्या द्युतांत तुम्ही आम्हाला जिंकलंत तर कांहीं विशेष नाहीं ! ही गालावरची लाली तुमची विजयी पताका असून तिचं स्वागत करण्यांत वरच्या दोन चंद्रज्योती आणि खालची रत्नांची दीपमाला सारख्या तळपत असतात ! [ मालविका व वासंतिका येतात ]

**शची**—काय ग ! किती ग वेळ केलांत तुम्हीं ! माधविका नाहीं दिसत कुठं ती ?

**माल**—तिलाच शोधायला लागला थोडा वेळ ! कालपासनं तिचं डोकं फिरलं आहे जरा !

**शची**—आणायची असती कि नाहीं धरून मेलीला ! चांगली शिक्षा केली असती !

**इंद्र**—जाऊं दे ! गरीब लोकांवर एवढं रागऊं नये हंः ! चालूं द्या ग तुमचं [ नाचगाणें चालूं होतें ] वाहवा ! वासंतिका, एक रम्य चीज आहे ! अगदीं आपल्या आईची नक्कल देते आहे उठवून ! वाहवा ! भारी गोड ! मालविके !.शाबास ! गावं तूंच ! गोड ! अगदीं गोड ! !

**शची**--हं, जरा अमृतपान करूं या ! आणा ग ! ( अमृतपान करितात ) एकदां होऊं द्या आणखी तुमची करामत ! स्वारी खुष झाली पाहिजे खूब ! ( नाचगाणं चालत असतांच नारद येतात. )

**नारद**--( स्व० ) देवेंद्राला विलासावांचून कांहीं सुचत नाहीं ! शंभर यज्ञाचं पुण्य पुरेपूर वसूल करून घेतात आणि या विलासाला सारखं--टिकविण्याकरितां नाहीं नाहीं ते उपाय योजून--

**शची**--अग बाई ? देवर्षी ! ( दोघे नमस्कार करितात )

**इंद्र**––यावं देवर्षे ! आज फार दिवसांत आगमन झालं ! आपल्या आगमनानं हा सेवक कृतार्थ झाला आहे ! आसनावर बसावं ! ( बसतात )

**नारद**––म्हटलं बरेच दिवसांत इकडं आलों नाहीं. कैलासीं गेलों होतों व तेथून मृत्युलोकीं जावं असं मनांत आणलं ! मृत्युलोक बराच बदलला आहे हल्लीं !

**शची**––काय खबरबात मृत्युलोकची ? कांहीं विशेष देवर्षींच्या नजरेला आलं ?

**नारद**––देवेंद्रा ! मृत्युलोकच्या हालचालीकडे अलीकडे तुमचं लक्षं मुळींच नाहीं असं दिसतं ! त्या लोकच्या अवस्थेकडे तुमचं लक्ष असणं अवश्य आहे असं नाहीं वाटत तुम्हांला ? जेव्हां पहावं तेव्हां तुम्हीं आपले विलासांतच दंग !

**इंद्र**––देवर्षे ! क्षमा करा ! काय ! मृत्युलोकीं रक्तपातासारखे कांहीं दुर्धर प्रसंग ओढवले आहेत काय ? दुर्भिक्ष, अपमृत्यु किंवा अन्य संकटं त्यांच्यावर आलीं आहेत काय ? किंवा––

**नारद**–– तुमच्या सुखाच्या पलीकडे तुम्हीं इतरत्र नजर कशी फेंकाल ? ज्यांच्या पुण्याईवर तुमचा हा स्वर्गलोक जीवंत आहे त्यांच्या स्थितीकडे तुमचं लक्ष न जाणं म्हणजे तुमचं अस्तित्वच गमावण्यासारखं आहे असं तुम्हाला नाहीं वाटत ?

**शची**––देवर्षींच्या मनांत खरोखरच विनोद करायाचा आहे काय ? मृत्युलोकांत खरोखरच दुःस्थिती वावरत असेल तर आपल्या कृपेनें तें संकट निवारण करणं कठीण नाहीं !

**नारद**––( हंसून ) हें बघा ! माझ्या नेहमींच्या स्वभावाप्रमाणं जर माझ्या आजच्या बोलण्याची तुम्ही वासलांत लावीत असलात तर माझं कांहीं म्हणणं नाहीं––पण––

**इंद्र**––पण काय ? देवर्षींचा विनोद कसा सुरूं होईल हें कळतच नाहीं ! मृत्युलोकाकडे आमचं मुळींच लक्ष नाहीं असं नाहीं, पण देवर्षींच्या म्हणण्याचा मतलब नाहीं ध्यानांत आला आमच्या ! मी आतां तपास करवितों ! ( जाऊ लागतो )––

**नारद**––मींच सारं सांगतों ! आतांच नको तपास करायला ! हें पहा !

देवेंद्रा ! तुमचं जरा चुकलंच ! एरवीं भारताच्या दुःस्थितीपेक्षा--तुमच्या स्वतःच्याच स्थितीकडे पहाण्याची वेळ आली आहे ! ! ( स्मित ).

**शची**--( घाबरून ) काय, कुणी शतक्रतु निर्माण झाला आहे तिथं ? ( नारदाचे-पाय धरून ) देवर्षे ! आपले आमच्यावर अनंत उपकार आहेत ! याच्यांतून--

**नारद**--इंद्राणी ! अशी घाबरूं नकोस ! शतक्रतु निघाला असला तरी त्याचा पाडाव करण्याकरितां तुमच्या संग्रहीं आयुधं कांहीं कमी नाहींत !

**इंद्र**--देवर्षे ! इत्थंभूत सांगायची कृपा करा !

**नारद**--देवेंद्रा ! असे चिंताक्रांत होऊं नका ! तेवढ्याकरितांच मीं इथं आलों आहें ! काल तुमच्या इथं गरुडवाहनांतून एक महात्मा आला आहे. तो बहुधा उदईक अमरावतींत प्रवेश करील ! तो तुझ्या सारखाच शतक्रतु किंबहुना सहस्त्रक्रतु आहे ! त्याच्या दर्शनाबरोबर--शची ! घाबरूं नकोस ! भवितव्यतेला इलाज नाहीं--देवेंद्रा ! तुम्हाला तुमचं सिंहासन सोडावं लागेल ! तो सूर्यासारखा तेजस्वी, अर्जुनासारखा योगी, बृहस्पती-सारखा विद्वान आणि वसिष्ठासारका तपस्वी आहे ! मला तर कांहीं सुचत नाहीं बुवा याला तोड !

**शची**—( रडत ) मुने ! आमचें हें वैभव एका क्षणांत जाऊन आम्हीं वनवासी होणार काय ? देवर्षे ! आम्ही आपणाला शरण आहोंत ! आम्हांला वांचवा या संकटांतून.

७ पद ( चालः-तुज देवा )

**पथ दावा सदया । मन जळतें नयना न दिसत । हर हर ही दैना ! ॥ धृ० ॥ त्याग सुखाचा नशिबीं आला । वैभव हरहर जाई विलया ! ॥ १ ॥**

**इंद्र**--इतपत् स्थिती आली आहे काय ? इतके लठ्ठ वेतनाचें लोक ठेवलेले असून त्यांच्या पैकीं एकानंही बंदोबस्त करूं नये अगर ही खबर मला देऊं नये आँ ! देवर्षे ! काय बरं त्याचं नांव ?

**नारद**—त्याचं नांव बलवंत ! पुण्यपत्तन म्हणून एक स्थान आहे तेथला तो राहणारा ! महायोग्य पुरुष ! तुमच्या ऐकण्यांत तर असेल त्याचं नांव ! नुकतंच कर्मयोग शास्त्रावर त्यानं प्रचंड व्याख्यान केलं आहे !



शचाः—काय ? कुणी शतक्रतु निर्माण झाला आहे काय ?

**इंद्र**––( विचार करून ) ऐकलं आहे मी त्यासंबंधीं ! पण देवर्षे, माझी अटकळ चुकली ! आतां कृपा करून आपणच याला कांहीं तोड काढा ! संकट तर अगदीं दाराशींच उभं आहे ! मी आपल्याला शरण आहें !

**नारद**—( विचार केलासं करून ) हुं ! हुं ! ! आहे कठीणच ! हें बघा देवेंद्रा ! तुमच्या खजिन्यांतली सारीं अस्त्र उपयोगाला आणा ! त्याला सामोरे जाऊन–करावं लागेल तेवढं आपल्या फायद्याकरितां त्याला इतमामानं आणा व तुमच्या एखाद्या खास प्रासादांत त्याला तूर्त ठेवा !–योग्य सत्कार चालू ठेवा ! तो एकदम तुमच्या सिंहासनावर जाऊन बसणार नाहीं एवढं मी पाहून पाहून घेतों ( स्व० ) नाहीं तरी तो कुठं इच्छा करितो आहे त्याची पण या प्राणप्रतिष्ठांची चांगली खोड जिरली पाहिजे–( उघड ) मी निघालोंच आतां महाविष्णूकडे ! त्यांच्या वांचून हें संकट निवारण करायला कोणीही समर्थ नाहीं ! येतों मी अँ ! शची, घाबरूं नकोस ! धैर्यानं चालू ठेवा सारं ! बाहेरून अशी ऐट दाखवा कीं यंव ! हेंच राजकारण, दुसरं काय ?

८ पद ( चालः–बरसन को आये )

**लव न मनिं भ्यावें । वादळ उठलें, गडगड करि जरि । त्यजा नच धीरा ! ॥ धृ० ॥ मृदु वदुनि, वरिवरी हासुनी, सदा रमावें तनमन विसरुनि । उगाच गरजे बिजली अंबरिं । जला न वितरित जरा ! ॥ १ ॥**

**इंद्र**—( शचीस ) घाबरूं नकोस ! बघतों मी कसा काय सहस्त्रक्रतु आहे तो !

( पडदा पडतो )

प्रथमांक समाप्त

---

# अंक २ रा

## प्रवेश १ ला

( स्थळ:--क्षिरसागरांतील श्रीविष्णूचें निवासस्थान
शेषासनावर श्रीमहाविष्णू बसलेले आहेत
महालक्ष्मी जवळ आहे, नारद दुसऱ्या आसनावर )

**विष्णू**--इंद्र इतका घाबरला आहे म्हणतोस ? खरं विचारशील तर ही स्वर्गसंस्था मी व्यर्थ निर्माण केलीं असं मला वाटायला लागलं आहे! आजपर्यंत या इंद्राकरितां मला कोण कष्ट सहन करावे लागले! राक्षसांच्या विरुद्ध इंद्राला मदत करितांना मला नाहीं वाईट वाटलं. पण बलवंतासारख्या माझ्या एकनिष्ठ भक्तापुढें मला इंद्राची कांहीं प्रतिष्ठा ठेवताच येत नाहीं ! आजपर्यंत आलेल्या सर्व प्रसंगांत हल्लींचा प्रसंग बिनतोड आहे ! कृष्णावतारीं मी अर्जुनाला सांगितलेला कर्मयोग जर कलियुगांत कुणाला खरोखर कळला असेल तर याच महापुरुषाला ! नारदा, तूंच सांग इंद्रपदावाचून त्याला कोणतं दुसरं स्थान देता येणार आहे ?

**नारद**--देवा ! यावेळीं आपण इंद्राला साह्य केलं नाहीं तर या नव्या इंद्राच्या अमलांत सारा भूलोक उठून स्वर्गाला येईल व तेथें जागा न मिळाल्या मुळं आपल्या सिंधु लोकांत त्यांना जागा द्यावी लागेल ! शिवाय इंद्र आपणाला अगदीं जवळचा नाहीं का ?

**विष्णु**--नारदा ! तुझ्या सारख्याला हें बोलणं शोभत नाहीं ! अरे ! बलवंताची दीर्घ तपश्चर्या ध्यानांत घे व त्याबरोबर इंद्राचेही दीर्घ विलासभोग स्मरणांत आण ! त्याचं ज्ञानाचं तंतोतंत आचरण लक्षांत घे म्हणजे इंद्राची स्तुतिस्तोत्रं नुसतीं शब्दांतच गुरफटलेली तुला दिसून येतील ! देवेंद्राचा अधिकार कांहीं वंशपरंचा नाहीं ! योग्य मनुष्याला विवक्षित तपश्चर्येनंतर इंद्रपदप्राप्ती होत असते अशी स्वर्गसंस्थेची योजना आहेना ? नारदा, जा इंद्राला सांग तुझं सिंहासन बलवंताला बहाल कर व तूं तपश्चर्येला निघून जा! हा न्यायाचा प्रश्न जर असा माझ्या पर्यंत आला तर माझा हाच निकाल आहे !

ग्रं. क्र. ८२९ ता. १-१२-२९



**नारद**––पण भगवन् ! आपला बलवंत कबूल आहे का त्या गोष्टीला? त्याला तर त्याची मुळींच अपेक्षा नाहीं !

**विष्णू**––अरे अपेक्षा नाहीं म्हणूनच त्याला तें द्यायचं ! कर्मफलाची अपेक्षा न ठेवतां कर्म करणं हाच कर्मयोग ! कर्माचं फल हें मिळणारच !

पद ( चाल–उदतननदीम )

**जगिं खचित धीर मिळवी फलां । मन कामना, सुफलवति न गणित सुखा न वरिकोपा जमवि व्यापा सुखदा ॥ ध्रु ॥ करि पथा सुलभ तो दाखवुनि दया । जनमनिं तया वसति राया झटत व्हाया अवन ॥ १ ॥**

बलवंताचा भूलोकचा इतिहास मोठा रोमहर्षण आहे ! मातृभूमीच्या उद्धाराकरितां त्यानं केलेले प्रयत्न जर एक एक तुला सांगायला लागलों तर, नारदा, माझी गीताच तुला पुन्हां सांगावी लागेल ! अरे, त्या तपस्व्यानं आपलं सारं आयुष्य खडतर तपश्चर्येंत व तुरुंगाच्या हालअपेष्टांत घालविलं ! माझ्या भरतभूमीची सेवा इतक्या धडाडीनं करणारा माझ्या रामदासानंतर व शिवरायानंतर हाच निघाला ! प्रतिकूल परिस्थितीशीं दमानं लढणारा हा भरतवीर लोकांच्या हृदयांत आपलं सिंहासन स्थिर करुन स्वर्गाला आला आहे ! त्याचा भूलोकीं झालेला सत्कार तूं पाहिला असतास तर मी प्रत्यक्ष महाविष्णू त्याच्या पुढं ठेंगणा दिसलों असतों ! त्या मानानं इंद्रपद कःपदार्थ आहे ! नारदा ! मी स्वतः त्याची इंद्रपदावर स्थापना करण्याकरितां जात आहें !

**नारद**––जगन्नाथ ! परमकारुणिक विश्वंभर । मी सेवक आपणापुढं काय बोलणार ? पण आपल्यापुढं आणखीन एक गोष्ट सांगण्याची परवानगी घेतों ?

**विष्णू**––नारदा, बोल ! तुझ्या मनांत कांहीं तरी निराळंच दिसतं आहे! कांहीं कळ लावायची इच्छा दिसते तुझी !

**नारद**––माझं नांवच कानफाट्या पडलं त्याला इलाज नाहीं. पण, तात, मी जर कळ लावलीच नाहीं तर आपली शोभन सगुण लीला मला कशी पहायला सांपडणार ? या ब्रह्मवीणेला विसावा मिळाल्यावर माझ्या प्रभुगुणगायनाच्या मिळकतीची अवस्था कशी होईल ?

**विष्णु**—( हंसत ) पण वेड्या ! तेवढ्याकरितां भांडणतंटे लावले पाहिजेत असं थोडंच आहे ? प्रत्यक्ष युद्धापर्यंत तर मजल किती तरी वेळा आणली आहेस तूं ! अरे माझ्यांत आणि माझ्या परम भक्तांत युद्ध हा अनन्य चमत्कार तूं जगाला दाखविलास त्यापेक्षां जरा सात्विक कळ लावायला शीक म्हणजे झालं !

**नारद**—या प्रसंगीं देवा माझं सारं सात्विकच प्रकरण आहे ! भक्तमाहात्म्य वाढविण्याकरितां जेव्हां आपण आपल्या भक्ताविरुद्धच शस्त्र घेतां तेव्हां अनाथनाथ ! जगाच्या परिवर्तनाच्या इतिहासाचं नवं पान लिहायला श्री जगन्माता लागत असते ! ( अर्धवट करुण स्वरानं ) देवा आपल्यांत आणि माझ्यांत युद्ध होण्याचा प्रसंग आहे हा !

**विष्णू**—( हंसून ) आतां मात्र नारदा ! तुझी ही सगळी लहर ध्यानांत आली ! हीं शस्त्रं आहेत, सांग यांपैकीं कोणतं आयुध तुझ्या डोक्यांत घालूं !

**नारद**—देवा, प्रथम माझं म्हणणं ऐकून घ्यावं न् मग आपसांत समजूत झाली नाहीं तर युद्ध आहेच !

**विष्णु**—बरं बाबा सांग काय तें ?

**नारद**—आपण बलवंताला इंद्रपद देणार म्हणजे तो स्वर्गांत राहणार ! आपण आपल्या इच्छेप्रमाणं करणारच व मी एका व्यक्तीला निराळं वचन देऊन चुकलों आहें ! माझं वचन खरं करण्याकरितां आपणांशीं युद्ध करावं लागेल मला !

**विष्णू**—या वीणेनं आणि चिपळ्यांनीं का युद्ध करणार नारदा ?

**नारद**—मी युद्ध कशानं का करीना ! युद्ध करणारा आपलीं शस्त्रास्त्रं थोडींच प्रतिपक्षाला दाखवीत असतो ?

**विष्णू**—बर बाबा नको दाखवूस. पण सांग तर तूं कुणाला वचन दिलं आहेस न् त्याचा या प्रकरणांशीं काय संबंध ?

**नारद**—देवा ! आपला अपमान या दासाच्या हातून होणार नाहीं अशी आपली खात्री आहेना ?

**विष्णू**—होऊं दे रे ! भक्ताच्या शिव्याही गोड लागतात इतकंच नव्हे तर मार देखील खाल्ला आहे मी त्यांच्या करितां !

पद ( चाल-उदनतान तनदेरेना )

**भजक दैवताचि मानितों। जरि तो सुखविल मजसि गाउनी कीर्ति वरित मीच पायीं लीन। मी चरण चुरिन हरि ॥ धृ ॥ भुवन मोहना विश्वप्रेमा स्वयें तयाच्या होई धामा। सत्यभक्त तरी जाणतो।१।**

**नारद**--भगवन् ! आपली प्रिय भगिनी भारतमाता हिला आपण विसरूनच गेलां आहांत ?

**विष्णू**—( विचार करून ) होय असं जरासं झालं खरं ! तिची अवस्था कठीण आहे यांत शंका नाहीं ! बरं पुढं ?

**नारद**--नाहीं, कबूल करा आपण !

**विष्णु**—बरं बुवा कबूल !

**नारद**—बलवंताच्या मृत्यूमुळं अत्यंत दुःखी झालेली भारतमाता मला भेटली व तिनं मला तिचा बलवंत परत आणून देण्याबद्दल आज्ञा केली आहे ! माझीही माताच ती ! पुत्रकर्तव्य म्हणून मी तिला होकार दिला की श्री महाविष्णूकडे जाऊन लवकरच तिची इच्छा पूर्ण करितों म्हणून ! इथं आलों तों आपला निराळाच मनोदय! मग भगवन, माझ्या वचनाची पूर्तता करण्या-करितां मला आपल्या सुद्धां सारा स्वर्ग उधळून लावला पाहिजे !

**विष्णु**—मी घालीन तिची समजूत !

**नारद**—बलवंताला तिच्या स्वाधीन करूनच ना ?

**विष्णू**—तसं आतां शक्य दिसत नाहीं !

**नारद**—मग आतां युद्ध टळत नाहीं ! भारतदेवी कदाचित् इंद्राचा नायनाट परभारेंच करील, नाहीं तर ती येथपर्यंत सुद्धां आल्यावांचून राहणार नाहीं ! देवा ! आपणही तिच्या अंकावर खेळलेले आहांत !

( इतक्यांत भारतमाता येते )

**भारत०**—भगवंता ! क्षीराब्धिनिवासा ! माझा बाळ स्वाधीन कर ! तुझी कृपादृष्टी माझ्याकडे फारा दिवसांपासून नाहीं ! कायरे, तूं असा निष्ठुर काय म्हणून झालास ? वेळ पडली त्यावेळीं मी तुला माझ्या आंगाखांद्यावरून खेळवलं ! तुझा धर्म वाढविला, तुझें गुणगायन माझ्या लेकरांनीं आजपर्यंत एकनिष्ठेनं केलं असतांना तुझी दृष्टि तिकडं कां फिरली नाहीं ? धर्मावर कुऱ्हाड पडली. मला अज्ञांतवासांत डांबून पडावं लागलं. परतंत्रतेची तलवार

माझ्या डोक्यावर लोंबत राहिली. नारायणा, तुझ्या लाडक्या गोधनाच्या गळ्यावर प्रत्यही सुरी फिरत असून त्या योगानं माझं ललाटपटल लाल होऊन माझे प्राण कासावीस व्हायला लागले; माझीं मुलं अर्धपोटीं विवस्त्र फिरताहेत, अशा परस्थितींत माझ्या दुर्दैवानं तुला सुखशय्या आठवली ! बरं, आठवली तर आठवो, पण तुझ्या नांवावर माझा बाळ माझं मुख उज्वळ करीत असतांना त्याच्या यत्नांना जरा कुठं यश येत चाललं होतं एवढ्यांत तुझ्या यमानं त्याला माझ्यापासून ओढून नेला !

**विष्णू**—मातुश्री ! आपण म्हणतां तें सारं खरं आहे ! पण माझं आपणाकडे लक्ष नाहीं असं मात्र नाहीं ! दैवयोग कुणाला चुकत नाहीं ! या आपण या आसनावर बसा, करूं विचार साऱ्या गोष्टींचा !

**भारत**—विचार काय करायचा आहे ? नारायणा ! माझं सिंहासन मला प्राप्त होईपर्यंत मी कोणत्याही सिंहासनाचा त्याग केला आहें ! पारतंत्र्याचं जोंखड माझ्या पायांत अडकलं असतांना तुझ्या सिंहासनाची पायरी चढणं मला कमीपणाचं वाटतं ! मी गरीब असलें तरी तुझी भगिनी आहें आणि युगायुगींच्या तुझ्या अवतार स्वरूपाची माता आहें !

पद ( चाल—लोटीसी कासया )

**आठवा माधवा। त्रिभुवनिं सुखद अवतार वा देवा ॥ धृ॥**
**सांगुनि अर्जुना तयिं न का मोहना मोहना। उरविला मुरलिरवही राधेस आठवा ॥ १ ॥**

पूर्वपुण्याईचा व परम पावित्र्याचा ठेवा तूं माझ्या स्वाधीन केला आहेस त्याच्या आधारावर मी आणि माझे मुलगे माझं सिंहासन काबीज करतील !

**नारद**—( स्व० ) मातुश्रींनीं खुद्दांनान खूब तडाखे लावायला सुरवात केली ! अगदीं मध्यवर्ती संस्थेला हात घातल्यावांचून कार्यसिद्धी व्हायचीच नाहीं ! हा खजिना एकदां का हस्तगत झाला म्हणजे मातुश्री म्हणते तसं व्हायला वेळ किती !

**विष्णू**—मातुश्री ! मला क्षमा करा ! कोण तुमचा बाळ, कुठं आहे तो ?

**नारद**—( स्व० ) वास्तविक देवांनीं असलें वेडे प्रश्न विचारूं नये !

**भारत०**—जसा कांहीं तुला माहितच नाहीं तो ! माझा बलवंत ! माझा



**भारतमाता**ः—माझं सिंहासन मला प्राप्त होई पर्यंत मी कोणत्याही सिंहासनाचा त्याग केला आहे.

प्राणविसावा ! तुझ्या दांडग्या दूतांनीं आणलारे इकडे ! स्वतःचं गरुडविमान पाठविलंस त्याच्याकरितां न् असं अज्ञान पांघरतोस ! सारं ज्ञान तुझ्यापासून उत्पन्न झालं आहे न् मला विचारतोस माझा बाळ कोण तें ? नारायणा ! माझा बाळ मला पाहिजे आहे ! कायरे नारदा ! बोलघेवड्या, इथं येऊन नुसता घृतकल्या मधुकल्या खात बसलास वाटतं ?

**नारद**—नाहीं मातोश्री ! मी भगवानांना विनंतीच करीत होतों, इतक्यांत आपण आलांत !

**विष्णू**—मोठी कठिण परिस्थिती आली आहे ! हिच्याकरितां आतां कदाचित् जननमरणाची रहाटी बदलून टाकावी लागेल का काय अशी मला चिंता पडली आहे ! आई, त्याला इंद्रपद देण्याची तजवीज करीत आहे मी ! मोहन आहे तुमच्याकरितां !

**भारत०**—नको आहे तुझं इंद्रपद ! माझं घरच माझं इंद्रपद आहे व माझी बाळंच माझी संपत्ति आहे ! मोहन असला तरी कार्याचा व्याप थोडा नाहीं ? ( दुःखानं ) तोहि कसा अगदीं कासावीस झाला आहे श्रमानं ! त्याचा अस्थिपंजर झाला आहे अगदीं ! नुकतांच जीवावरच्या दुखण्यांतून तुझ्या कृपेनं वांचला ! तसाच हा माझा मला परत दे म्हणजे झालं ! इथूनच कां होईना कृपादृष्टीनं पहा म्हणजे झालं ! मी स्वतंत्र झालें म्हणजे त्याप्रमाणें भाऊबीजेला ये !

**विष्णू**—देवते, तुझ्या पुण्याईचा मी बंदा गुलाम आहें ! बरं आहे ! जरा दमानं घ्या ! मी याला कांहीं तरी तोड काढतों ! आपण थोडी विश्रांति घ्या ! आजवर नसलं तरी आतां माझं तुमच्याकडे प्रत्यक्ष पूर्ण लक्ष राहील असं मी तुम्हाला आश्वासन देतों !

**नारद**—( स्व० ) अशी शोभा केल्यावांचून देव वठणीवरच यायचे नाहींत !

**भारत०**—( सस्मित ) चालेल ! यापुढं जरी तूं आमच्यावर नजर ठेवलीस तरी पुरे होईल ! लक्ष्मीलाही भेटून घेतें ! तिनंही जरा आमच्याकडे दुर्लक्षच केलं आहे !

**नारद**—( स्व० ) जसा नवरा तशीच बायको ! आतां लक्ष्मी मातुश्रींची सुद्धां खरडपट्टी निघेल ! मी आहे जवळच थोडा थोडा भाग घ्यायला !

**विष्णू**—नारदा चल ! तूं भारी खाष्ट आहेस ! एकदां तुझीच खोड मोडली पाहिजे मला चांगली !    ( जातात )

## प्रवेश २ रा

( अमरावती जवळच्या नदीकिनाऱ्यावरील एक रस्ता
लोकमान्य व माधविका )

**लोक०**--बाई ! तुम्ही कुणीतरी शापित देवतां आहांत असं मला वाटतं. एरव्हीं एवढं ज्ञान एथल्या साधारण अप्सरेच्या अंगीं असलेलं माझ्या पाहण्यांत आलं नाहीं !

**माध०**--महाभाग ! हा केवळ आपल्या पुण्यदर्शनाचा परिणाम आहे ! भूलोकचे अनभिषिक्त राजे म्हणून आपली कीर्ति नारद मुनींनीं मला सांगितली ! आपली सेवा करण्याचा योग आला हें मी आपलं भाग्यच समजतें ! आज आपण आपली कर्मयोगाची शिकवण मला दिली, मी धन्य झालें ! महाराज, ज्याच्याजवळ असला ज्ञानाचा अपूर्व ठेवा आहे तें भारतवर्ष अशा हीन स्थितीला कां बरं आलं ?

**लोक०**--( उसासा टाकून ) बाई ! या सर्वाला 'दुर्दैव' म्हणणं माझ्या जीवावर येतें, पण तें दुर्दैवच आहे असंही म्हटल्यावांचून अन्य तऱ्हेनं समाधान करितां येत नाहीं !

**माध०**--महाराज ! पण आपल्या या बोलण्यानं माझं समाधान होत नाहीं! सूर्यासारखी तेजस्वी वस्तू जवळ असल्यावर अंधारांत चांचपडणाराला दुर्दैवी कसं म्हणतां येईल ?

**लोक०**--( दुःखानें ) बाई ! माझं सात्विक भारतवर्ष धोकेबाजीला बळीं पडलं ! हिंदुस्थानची आलोट संपत्ति राकट राक्षसांच्या धुंद डोळ्यांना हवीशी वाटूं लागली ! याच वेळीं कर्मकांडाच्या खोट्या नाण्याचा निनाद साऱ्या भारतवर्षभर होऊं लागला ! भगवंतानं उपदेशिलेल्या कर्मयोगाच्या मानगुटीवर बसलेलं हें अंधश्रद्धेचं भूत विदेशी वेताळांचा प्रतिकार करूं शकलं नाहीं ! झालं ! सनातन धर्माला ग्रहण लागलं ! वेद नुसते बडबडीच्या शब्दांत राहिले ! भेदाचं भयंकर बंड माजून भांडणाचं मूळ रोवलं गेलं व आतां तर त्याचा प्रचंड वृक्षच निर्माण झाला आहे !

**माध०**--अशा वेळीं भगवान् प्रत्यक्ष अवतार घेत असतात ना ?

**लोक०**--होय घेत असतात व तसा तो त्यांनीं घेतलाही होता ! शिवप्रभू आणि श्रीसमर्थ भगवंताचे अवतार होते पण आमचं दुर्दैव पुन्हा आडवं--

**माध०**—महाराज ! क्षमा करा ! दुर्दैवावर आल्यावांचून या दुःखाची संगतीच लागत नाहीं काय ?

**लोक०**—बाई ! काय करूं !–नाहीं आतां तो शब्द मी पुन्हा उच्चारणार नाहीं–कालचक्र फिरलं ! जसा भाव तसा देव ! देवाचं अधिष्ठान पराक्रमाच्या मुळांशीं जोंवर होतं तोपर्यंत सारं सुरळीत चाललं ! आयत्या वेळीं कलीनें आपला प्रभाव गाजविण्यास सुरवात केली ! घरबुडव्या लोकांचे थवेच्या थवे उदयास आले ! शत्रूंच्या शामियानांच्या शीतळ छायेंत अन्न संतर्पणं सुरू झालीं ! विनाशकालाची वाट चालत असलेली राजसत्ता म्हाताऱ्या वारांगनेप्रमाणं शृंगार करूं लागली ! आशाळभूतांच्या तोंडाला पाणी सुटलं आणि नुकत्याच फलपुष्पांनीं शोभीवंत झालेल्या आमच्या वैभववृक्षावर अग्निवर्षाव झाला !

**माध०**—महाभाग, दुःखद इतिहासाबद्दल प्रश्न विचारून मी आपणांला दुखवीत तर नाहीं ना ? महाराज ! भारताचा माझा अगदीं जिव्हाळ्याचाच संबंध असावा असं मला कां वाटायला लागलं आहे ? आपल्या दर्शनाबरोबर माझी अशी स्थिति कां बरं व्हावी ? भारताचं पारतंत्र्य हा शब्द ऐकतांच स्वर्गसुखाला लाथाडून टाकण्याची बुद्धि मला कां व्हावी ? माझ्या रक्ताचा प्रत्येक बिंदू कढईंतील तापलेल्या तेलाप्रमाणं सळसळून कां निघावा ?

**लोक०**—( स्व० ) ही बाई असाधारण अप्सरा आहे ! ही अप्सरा खास नव्हे ! ही कुणी तरी भारतांतील महापुण्यवान् स्त्री असून देशसेवेची राहिलेली इच्छा तृप्त होण्याकरितां पुन्हां भारतावर जावं म्हणून तपश्चर्या करीत असलेली वीरस्त्री खास आहे ! भारताच्या सायंकालांतील अनंत तेजस्वी तारका, वीरतेची तत्वोज्वल मूर्ति महाराणी लक्ष्मीबाईतर नव्हे ही ?

**माध०**--महाराज ! आपण बोलत कां नाहीं ? हात जोडतें मी; आपणाला आतां प्रश्न करून परिश्रम देणार नाहीं ! जाऊं का मी ? ( जायला लागते. )

**लोक०**—नको ! नको ! महादेवते ! माझी कल्पना जर खरी असेल तर मला तुला वंदनच केलं पाहिजे ! तूं भारतांतील कुणी तरी स्वातंत्र्यदेवता खास आहेस ! तूं आमची राणी लक्ष्मीबाई का आहेस ?

**माध०**--राणी लक्ष्मीबाई ? स्वर्गांत जर केव्हां पूर्वस्मृति जागृत होणं शक्य असेल तर या हातांत तरवार धारण केल्याचं मला स्फुरण होतं ! मी

केलेला भीषण संग्राम मला आठवतो ! पुरुषवेषानं अश्वावर बसून रणलीला केल्याचीही मला मनोमय साक्ष पटते ! त्या दिवशीं भारत मातेला पाहिल्याबरोबर ही जिव्हाळ्याची देवता आहे असंच माझ्या मनानं घेतलं ! महाभाग, इथून सुटका होण्याचा योग अगदीं परस्वाधीन आहे काय ?

**लोक०**—होय, मृत्युलोकीं केलेल्या पुण्यामुळं स्वर्ग मिळतो व त्या पुण्याचा क्षय झाला म्हणजेच येथून जातां येतं ! माझी माता माझ्या मागं लागून इथं आली आहे पण अजून तिची माझी भेट झाली नाहीं ! जिच्या संतोषाकरितां आजवर देवांनीं अनेक अवतार घेतले तिला या कालचक्राच्या कोलांटीनं निस्तेज करावं व स्वर्गातल्या मालविकेसारख्या सामान्य अप्सरेनं तिची हेटाळणी करावी हा दुर्विलास माझ्या काळजाचं पाणी करून सोडतो !

**माध०**—महाभाग ! नाइलाज आहे नाहींतर आतां तरवार पुन्हां धारण केली असती व तिची अवहेलना करणाऱ्याच्या नरडीचा घोटच घेतला असता !

**लोक०**—बाई ! भारतांतली हल्लींची परिस्थिति निराळी आहे ! पारतंत्र्यपाश तरवारीच्या तामसी धारेनं तोडायचे नसून लेखणीच्या अगर जिव्हेच्या नाजूक करामतीनं त्याची वाट लावावयाची आहे ! तरवार हा शब्द तूर्त भारतांत आपल्या कोशांतून काढून टाकला आहे व कित्येक वर्षं त्याची जरूर लागावयाची नाहीं ! कालांत हल्लीं बरंच परिवर्तन झालं आहे ! ( मालविका व शची येतात )

**माल०**—बघितलंत ना बाईसाहेब यांचे कसे काय बेत चालले आहेत तें? ही माधविका खाल्लेल्या अन्नाला बरीच, जागली म्हणायची ! महाचोंबडी आहे मेली ! आपल्या शत्रूशीं प्रत्यक्ष कारस्थान करते ! बाईसाहेब, अवश्य शिक्षा करावी ! लब्री मेली ! !

**शची**—मालविके ! तिला बोलव बरं इकडं !

**माल**—माधविके ! अग माधविके ! मोठी आली आहे वसिष्ठवामदेव ! त्या पुस्तकांत काय बघते आहे कोणाला माहित—पाहिलंत बाईसाहेब ! कसली उर्मट आहे ही—माधविके—अग माधविके ! देवी इंद्राणी तुला बोलावीत आहेत ना ग !—( माधविका मागें पाहाते ) जळले का ग कान तुझे ! बाई ! बाई ! धन्य झाली ग बाई तुमची आतां !

**माध०**—महाभाग ! देवी इंद्राणी आल्या आहेत ! काय ग केलं मी ? वस्‌कन् कां ग आंगावर येतेस? बाईसाहेबांच्या समोर एवढ्या मोठ्यानं बोलूं नये हें नाहीं समजूं वाटतं दुसऱ्याला शहाणपण शिकविणाराला ?

**लोक०**—( शचीला नमस्कार करून ) मातुश्री ! आपल्या दर्शनानं मी कृतार्थ झालों ! माझे आपणाला अनंत प्रणाम असोत !

**माल०**—( स्व० ) दुसऱ्याला लुबाडायच्या कारस्थानांतली सुरवातीची भाषा हीच असते !

**शची**—तुम्हींच आलांत नाहीं का गरुडविमानांतून ?

**लोक०**—होय! श्रीमहाविष्णूचं गरुड विमान या पामराची लायकी नसतांनाही इथं घेऊन आलं !

**माल**—( स्व० ) ओ ! हो ! हो ! ! केवढी नम्रता ! पण हें सारं चंचुप्रवेश होत नाहीं तोंवरच बरं !

**शची**—इथं बरं वाटतं का तुम्हांला तिथल्यापेक्षां ?

**लोक०**—न वाटून काय उपयोग ? इथं कांहीं मी माझ्या इच्छेनं आलों नाहीं. तसाच परत जायला मी स्वतंत्रही नाहीं ! ठेविलें अनंते तैसेंच रहावें ! बाकी मला जर आतां कुणी परत जा म्हटलं तर मी तयार आहें !

**माल०**—( स्व० ) अग अग म्हशी मला कां नेशी ! आहे कां नाहीं खासी ! इंद्रपदाचा लोभ इतका बळकट आहे कीं यांना इथनं कुणीं ढकललं तरी जायचे नाहींत हे ! ब्रम्हज्ञान केवढं ! म्हणे "ठेविलें अनंते तैसेंचि रहावें" !

**शची**—आमच्या संबंधानें तुमच्या लोकांत निष्ठा आहे काय ?

**लोक०**—देवी ! हा प्रश्न उद्भवण्याचं कारणच नाहीं ! आमच्या यज्ञांतून देवेंद्रांना हविर्भाग नित्यशः मिळत असतो ! हिमप्रलयाचें वेळीं आर्यांचं व त्यांच्या गोधनाचं देवेंद्रांनीं रक्षण केलं हें विसरण्याइतके आम्हीं आर्यांचे वंशज कृतघ्न झालों नाहीं !

**माल०**—[स्व.]म्हणूनच इंद्रपद प्राप्त होण्याइतकं पुण्य आचरण करून देवेंद्रांना पदभ्रष्ट करण्याची पाळी आणली आहे वाटतं ? ( उघड ) बाईसाहेब ! सरकारस्वारी आपली वाट पहात असेल नंदनवनांत ! मृत्युलोकच्या गोष्टींशीं आप-

णाला काय करायचं आहे ? मी ऐकलं आहे उपकारीं अपकारेच फार आहेत मृत्युलोकीं !

**माध०**--मालविके ! तोंड आटप! प्रत्यक्ष देवी इंद्राणी देखील ज्याच्याबद्दल-वाईट उल्लेख करीत नाहीं, इतकंच नव्हे तर राज्ञीपदोचित भाषणानं विचारपूस करितात त्यांच्या बद्दल तुझ्या तोंडांतून असली उर्मट भाषा ऐकली म्हणजे तुझ्या कुणी परभारे श्रीमुखांत दिली तरी देवीला कांहीं वाईट वाटणार नाहीं !

**शची**--खरीच शहाणी आहेस तूं माधविके ! यांच्याजवळ कांहीं शिकत असतेस वाटतं ?

**माल०**--( स्व० ) फितूरीची विद्या शिकत आहे चांगली.

**लोक०**--देवी ! त्या बाई स्वर्गलोकच्या एक भूषण आहेत !

**माल०**--महाराणीपेक्षांही वरिष्ठ आहे म्हणाना ?

**लोक०**--मलातर वाटतं, ही मृत्युलोकची पुण्यदेवता परत जायला आपल्या आज्ञेची वाट पहात आहे !

**माल०**--( स्व० ) पुण्यदेवता आणि पुण्यदेव यांचा भारीच सुळसुळाट झालेला दिसतोय ! (उघड) अहो, आम्ही पुण्यवान् आहोंत हें उघडच आहे. उगीच नाहीं स्वर्ग मिळत कांहीं ! पण खाल्याघरचे वासे मोजणारी मंडळीच फार यायला लागली आतांशा ! बंदोबस्त केला पाहिजे अशांचा चांगला !

**माध०**--मालविके ! गप बसतेस कां भडकावूं श्रीमुखांत ! कोण ग मोजतंय खाल्या घरचे वांसे ! मृत्युलोकच्या पुण्याईचा खुराक जर तुम्हांला इथं मिळाला नसता, फार काय पण प्रत्यक्ष इंद्र महाराजांना जर मृत्युलोकांतनं हविर्भाग अर्पण झाला नसता तर तुमच्या ह्या स्वर्गाचा मागमूस तरी राहिला असता का ? हीं विविध विलासस्थानं, आणि तुम्हां सर्वांचे हे अमर्याद विलास कुणाच्या बलावर चाललेले आहेत ? तुम्हांला वाटतं आम्ही त्रीलोकाचे मालक, प्रत्येकानं आमच्या ओंजळीनं पाणी प्यावं, तुमच्या बऱ्या वाईट खेळाकडे न पाहतां तुमच्याकडे तुम्ही द्याल त्याकरितां दृष्टी वळवावी ! पण हा न्याय भगवंताला कसा रुजू होईल ? ज्या या महापुरुषाला तोंड टाकून अद्वातद्वा बोललीस त्याच्या पराक्रमाशीं प्रसंग पडला म्हणजे त्या धडाडीच्या विजेनें तुमचे डोळे दिपून जातील, अमृतानं पोसलेल्या तुमच्या अंतःकरणातलं गरळ खळखळून



लोकमान्यः—देवी, आम्ही भूलोकचे आर्य ··· असुरी अत्याचार प्राणांत झाला तरी करणार नाहीं.

बाहेर पडेल व त्याच्या पाठीशीं असलेल्या भगवंताच्या अतर्क्य चपराकीनं तुम्ही सर्वजण तिरमिरी येऊन खालीं पडाल !

**लोक०**—–बाई ! जाऊं द्या ! मूर्खांशीं जास्त बोलूं नये ! ( शचीस ) देवी! ह्या बाई जरा तेजस्वी वृत्तीच्या आहेत, आमच्या लोकांतील महापराक्रमी स्त्रीरत्न महाराणी श्रीलक्ष्मीबाईचा स्वातंत्र्याकरितां तळमळणारा आत्मा या बाईंच्या देहांत प्रविष्ट झाला आहे अशीच प्रेरणा ह्यांना पाहिल्यापासून मला झाली आहे. मी पाहातों, इथं आल्यापासून आमच्याकडे संशययुक्त दृष्टीनं पाहण्यासारखं संशयी वातावरण निर्माण झालं आहे! पण देवी ! आपली खात्री असूं द्या कीं आम्ही भूलोकचे आर्य दगाफटका अगर असूरी अत्याचार प्राणांत झाला तरी करणार नाहीं.

**शची**—( हांसून ) इतकी खातरजमा नको करायला माझी ! माझी खात्री आहे त्याबद्दल! पण मला वेळीं इतकं सांगावसं वाटतं कीं प्रत्यक्ष देवेंद्राच्याबद्दल अनुदार भाषा वापरणं चांगलं नव्हे. त्या योगानं उगीच संशयाला जागा मिळते ! तुम्ही चांगले लोक आहांत हें पाहून आह्मांला फार आनंद वाटतो. पण त्याप्रमाणं वागणूक ठेवणंही अत्यंत महत्वाचं आहे.

**माल०**—देवी हंसताहेत ! चांगला सडकून राग यायचा तें सोडून ह्या आपल्या चांगल्या हंसताहेत ! शांततेचा कडेलोट झाला ! अगदीं गळ्याशीं येऊन भिडलं तरी शांतच ! दोषाचं मूळ वाढीस लावून त्याच्या झाडाचीं कडू फळं चाखायला मिळतील हें कसं नाहीं यांच्या ध्यानांत येत? नाहीं ग बाई! मी नाहीं जाऊं द्यायची स्वर्ग हातचा ! ( वि० करून ) उं! हुं ! देवींना नाहीं जुळायचं तें ! मला महाराजानांच सांगितलं पाहिजे सारं ! ( माधविकेकडे क्रुद्ध दृष्टी करून ) थांब मेले ! अशी करतें तुझी कीं आठवणच करीत राहशील ! आणि मेल्या तुलाहि घेतें पाहून ! मला मूर्ख म्हटलंस होय ? (उघड) बाईसाहेब ! चलायचं ना लवकर ? महाराज रागावतील नाहींतर !

**शची**—चल बाई ! येते बरं मी ! मला राग नाहीं आला बरं कसला ? आमची मालविका जरा अधिकच आहे पण पोटांतली निर्मळ आहे हो ! मालविके ! सायंकाळीं मला येऊन भेट अं !

**माध०**—–अवश्य येईन बरं ! या महाभागांनाही घेऊन येईन वाटेल तर महाराजांकडे !

**माल०**--( एकीकडे ) राणीसाहेब ! नको म्हणाना ! ह्या पीडा पडायच्या गळ्यांत ! अहो, अगदींच शांति निरुपयोगी आहे !

**शची**--( लक्ष न देतां ) येतें बरं !

**लोक० व माध०**--( प्रणाम करितात )--**लोक०**--देवींना आमचे शतशः प्रणाम असोत ! देवींच्या अगर सुरेंद्रांच्या सेवेला माझी गरज लागल्यास आज्ञा व्हावी !

( शची व माधविका जाऊं लागतात. )

**माल०**--( जातांना ) या म्हणावं ! मी ही करितें तयारी तुमच्याकरितां! उगीच नाहीं मी देवेंद्रांच्या मर्जीतली अप्सरा ! असा देईन बार भरून कीं पार गारद ! ( जातात )

**माध०**--महाभाग ! चलावं आतां मंदिराकडे ! देवेंद्रांच्या जवळ असणारीं अशी हीं सुखलोलुप माणसंच सारी गडबड करीत असतात--यांनाच पायबंद घालायला हवा असतो. कसली खुळचट आहे ही बघितलीत ना? तिला काय वाटतं कीं आपण इंद्रपद हरण करणार आहांत म्हणून ?

**लोक०**--बाई ! खाई त्याला खवखवे ! आपण सुखी असावं, बाकीच्या जगानं मेलं तरी चालेल अशी ज्यांची भावना असते त्यांच्या सुखाच्या कल्पनेंत व ते मिळविण्याच्या प्रयत्नांतच अखेरीस त्यांचा नाश असतो हें तत्व मी तुम्हांला विशद करून सांगितलंच आहे ! तात्पुरतं तुम्हांला माझं एवढंच सांगणं आहे कीं तुम्ही आपल्या जिव्हेला थोडं आवरून घेत चला ! आपणाला आपल्या मायभूमीच्या सेवेकरितां लवकरच परत जायचं आहेना ? अशानं अडथळा होईल ! परवशता अशी नेहमीं जाचक होत असते ! भारतमाता माझा शोध करीत कुठं फिरत आहे तिचा पत्ता लावणं हें आपलं पहिलं काम !

**माध०**--आपण निर्धास्त असा ! मी लावतें तिचा शोध आणि आपली भेट करवितें ! महाभाग ! माझ्या मनोवृत्तीवर आपल्या साहचर्यामुळं जें एक स्फुरण संचरलं आहे त्यामुळं मला कांहीं अशक्य दिसत नाहीं ! मला पूर्ण कळालं कीं, आपला माझा जिव्हाळ्याचा संबंध आहे ! या परकी जगांत आपल्या सेवेंत राहीनच राहीन, पण परत गेल्यावर आपल्या मायभूमीच्या उद्धारार्थ मी आकाशपाताळ एक करीन. सारा भूलोक मातृभूच्या जयजय-

काराच्या एकाच आरोळीनं व्याप्त करीन. भ्याडांच्याही अंतःकरणांत चैतन्य उत्पन्न करीन. आसेतुहिमाचल मातृभूच्या प्रेमानं न्हावून काढीन आणि नंतर मी आपला अवतार पूर्ण करीन !

**लोक०**—पुण्यदेवते ! तुझ्या पुण्याईचा हा सेवक "तथास्तु" या शब्दावाचून आणखी काय म्हणणार ? चला आतां (जातांना) खरं तेज झांकून ठेवलं तरी कसं झाकलं जाणार !

(जातात)

---

## प्रवेश ३ रा

(इंद्राचा दिवाणखाना)

**इंद्र**—(स्वगत) म्हणावं माझ्याशीं गाठ आहे ! इंद्रपद हातीं लागायला प्रत्यक्ष परमेश्वरच आला पाहिजे ! इंद्रपद मला मिळालं तें कांहीं सुखासुखी मिळालेलं नाहीं ! वाटेल त्या भामट्यानं उठावं आणि इंद्रपदाची आशा धरावी इतकं सोपं तें खास नाहीं ! शतक्रतुत्वावर इंद्रपदाची प्राप्ति केवळ भगवंतांच्या हट्टामुळं ठेवली गेली पण त्याकरितां कुणीही प्रयत्न करावें व तें सिद्ध व्हावें अशी सवलत मी आजपर्यंत कुणाला मिळूं दिली नाहीं ! साम, दाम, दंड आणि भेद यांपैकीं एक अगर सारे उपाय योजून राहिलेली सत्वभंगाची माझी अमोघ मात्रा आजवर लागू पडली नाहीं असा प्रसंगच नाहीं ! हा म्हणे शतक्रतु आहे ! नारदाला देखील चळ झालेला दिसतो ! त्याची ती आई इथं आली होती तिची वाट चुकवून दिली ! ती गेली असेल क्षीरसागराकडे बोंबलत ! श्रीविष्णू लावतील तिची वासलात परभारें, पण आपणही स्वस्थ बसता उपयोगी नाहीं ! साध्या उपायांनीं जुळल्यास ठीक आहे नाहींतर बरेच दिवसानंतर धनुष्याला हात घालावा लागेल ! इलाज नाहीं, इंद्रपद मिळविलें तें जाऊं देण्याकरितां खास नव्हे ! सारा स्वर्ग उलटूं दे. मारुताला बेफाम होऊं दे, मी माझं इंद्रपद सोडणार नाहीं ! (पडद्यांत तंतुवाद्यें वाजतात) वाद्यें कोण वाजवीत आहेत तिकडे भलत्या वेळीं ? कां वाद्यांच्या या प्रतिनिनादानं माझ्या प्रतिज्ञेला दुजोरा दिला ? हेंच खरें ! कोण आहे तिकडे वासंतिके, मालविके !—

**माल०**—मी आहें महाराज !

**इंद्र**––मालविके ! माझी खात्री आहे तूंच असायची ती ! तिन्ही त्रिकाळ माझ्या सेवेंत तुझ्यावांचून दुसरी मला दिसतच नाहीं ! या वेळीं सुद्धां मला तूंच हवी होतीस !

**माल०**––सेवेस हजर आहें ! आज्ञा व्हावी !

**इंद्र**––मालविके ! मला तुझा मोठा लोभ येतो ! तूं माझी खरी आवडती अप्सरा–आहेसना ? सांग बरं एकदां !

**माल०**––( लाजून ) हें काय विचारायचं महाराज ! आम्ही आपल्या दासी आहोंत ! आपलं प्रिय करणं हेंच आमचं काम ! आपली कृपा नसली तर हें सारं सुख आम्हाला लाभलं असतं का ?

**इंद्र**––माझ्या किंचित वांकड्या नजरेनं बरोबर हें सारं सुख लयास जाईल ही तुमची खात्री आहेना ?

**माल०**––महाराज, हें नाकबूल कसं करवेल? पण हा असा प्रश्न मनांत कसा आला ? आमच्या हातून असा कोणता अपराध घडला का तसा आपणाला संशय आला ? एक मेली तशी निघाली म्हणून आम्ही साऱ्याच कांहीं तशा––

**इंद्र**––मालविके ! तुझी खरी निष्ठा आहे माझ्या ठिकाणीं ! माधविकेचं जाऊं दे ! बघतां येईल तिच्याकडे नंतर. सध्यां एक काम करायचं आहे !

**माल०**––आज्ञा व्हावी !

**इंद्र**––करशील ? अगदीं खात्रीपूर्वक ? लौकर सांग आणि वचन दे ! काम कांहीं कठीण नाहीं ! अगदीं तुमच्या हातचा मळ पण त्यांत जरा खुबी आहे !

**माल०**––महाराज अशी शंका कां घेता ? काय असं कठीण काम आहे तें तरी कळवावं ! मी आपलं शिर कापून महाराजांच्या चरणाजवळ ठेऊं का ? आईबाप, गणगोत, आप्तबंधू यांना आणून महाराजांच्या पायांवर घालूं का ? एखाद्या तपस्व्याचा तपोभंग, सत्वनिष्ठाचं सत्व हरण करण्याची महाराज आज्ञा व्हावी. कैलासीचा शंकर किंवा प्रत्यक्ष महाविष्णूची मति गुंग करून आपणाला दाखवूं का ?

**इंद्र**––शाबास ! मालविके ! अप्सराकुळाला तूं खरोखरच भूषणभूत आहेस ! या तुमच्या निष्ठेकरितांच मी तुम्हांला या दर्जाला पोंहचविलं आहे ! प्रस्तुत काम तुला वाटतं तितकं कठीण नाहीं !

**माल०**––लौकर आज्ञा व्हावी महाराज ! दासी तयार आहे !

**इंद्र**––ऐक तर माग ! तो बलवंत आहे ना, त्याचं सत्व हरण झालं पाहिजे ! अगदीं तुझ्या लायकच काम आहे ! दिसायला तसा कणखर दिसत नाहीं ! लौकर येईल तावडींत ! जरा शृंगाराचा अतिरेक केला कीं आलाच घेतांत !––

**माल०**––उंः ! हें अगदींच सोपं ! जरा राकट न् अरसिक दिसतोय पण होईल सरळ !

**इंद्र**––मालविके, तरीपण जरा संभाळूनच बरं ! रंभेला विचारलं नाहींस तिची कशी फजिती झाली तें ? हे भूलोकचे बावळट अंतर्यामी भारी शहाणे आणि चलाख असतात ! नाहीं––तुझ्याबद्दल खात्री आहे म्हणा––तरी म्हटलं सांगून ठेवावं––अगदीं असं होऊंदे की पुरा चितच झाला पाहिजे !

**माल०**––ती मेली सटवी आणील अडथळा जरासा ! महाराज ! तिचा निकाल केला तर प्रथम ! महाराजांनी शत्रंच्या गोटांत तिला अगदींच मोकळी सोडली !

**इंद्र**––तूं हें अगोदर साधलंस कीं घातला तिला अचुक पायबंद ! कांहीं झालं तरी ती इथलीच आहे ! म्होरक्या अगोदर गिळला पाहिजे ! बाजार बुणगे मागाहून !

**माल०**––जशी आज्ञा ! करतें तयारी एकदम अन् आपणांला लौकरच विजयाची वर्दी देतें.

**इंद्र**––मालविके, जा विजयी हो ! हा एवढा विजय मिळाला कीं तुला पहा राणीपद देखील मिळण्याचा संभव आहे ! जा––मी खोटं नाहीं बोलत शची अगदींच " स्त्री " आहे ! तुझ्या ठिकाणीं स्त्रीचं लावण्य आणि लाघव तर आहेच पण देशचे देश अचुक गारद करणाऱ्या कारस्थानी मुत्सद्याचं मार्मिक डोकंही आहे ! इंद्राणी तुझ्या सारखीच असावी—जा !––पण हो ––तुझ्या तिथल्या अभिनयाची एकदां तालीम करून दाखीव न् मग जा !

( मालविका नृत्य गायन करिते )

**इंद्र**––नको, जास्त नको ! बलवंत का कोण तो या ललीतलीलेनं मृदु-सुहास्यानं, तीर्यक् कटाक्षानं न् गोडच गोड नुपूरस्वानं गार झालाच पाहिजे ! मालविके ! भिल्लिणीचाच वेष घेऊन जा तूं तिकडं. कैलासनाथानां

जसं देवी पार्वतीनं वेड लावलं तसं तूं त्याला आपल्या मागं भटकायला लावणार यांत शंका नाहीं. माधविकेची भीति बाळगूं नकोस ! ती जरी अप्सरा असली तरी अमळ राकटच आहे. ह्या तुझ्या लीला तिला नाहीं कळायच्या ! खरंच तूं राणीपदाला अगदीं योग्य आहेस ! हं ! ये बैस या आसनावर ! चल लाजूं नकोस--बैस न् तुझ्या हातचा एक सुंदर विडा आणि अमृताचा प्याला मला दे न् मग जा ! तूं आज मला गार केलं आहेस ! माझं सिंहासन रक्षण केल्याबद्दल पहिलं बक्षिस मी तुला देणार आहें !

( मालविका बसते व प्याला इंद्राच्या तोंडाला लावते. तोंच शचि प्रवेश करिते )

**माल०**--महाराज ! देवी आल्या आहेत मी जातें आतां !

**इंद्र**--बैस ग ! ये ! शची तूंही मालविकेच्या हातचा घे अमृताचा प्याला नेहमींच्या अमृतापेक्षां मधुर आहे ! मालविका अंतर्बाह्य मधुर आहे ! मालविके ! आण आणखी एक प्याला ! उत्तम तांबूल तयार आहेना ?

**शची**--असा हा बेहोष आनंद काय म्हणून आणि मालविकेसारख्या सेविकाला स्वतःच्या बरोबरीच्या आसनावर ? माझ्या आसनावर बसविण्यासारखं तिनं कोणतं शतकृत्य केलं आहे ?

**इंद्र**--रागावूं नकोस ! शतक्रतुला जिवदान देण्याकरितां दुसऱ्या एका शतक्रतूचा जीव घेण्यास चाललेली ती पुण्यवती आहे ! तिची करामत अपूर्व आहे ! तिच्या यशाची मला खात्री आहे ! शची ! मालविका ही एक अमोल चीज आहे ! अगदीं तुझ्या योग्यतेची आहे !

**शची**--देवेंद्र ! आपण काय बोलतां हें ? माझ्या योग्यतेला मालविका-चढल्यानंतर इंद्रच काय पण इंद्रलोक तरी जीवंत राहूं शकेल काय ? दासी राणी झाल्यावर दास राजे नाहींका व्हायचे ? आपण हें काय आरंभलं आहे ? संकट आपण समजतां तेवढं अनिवार आहे किंवा कसं हें आपण पाहिलंच नाहीं. त्यांतून या मानाकरितां लालचावलेल्या चटोरांना असं आपण चढवून ठेवलं तर ज्याच्यापासून भीति आहे असं आपण समजतां त्यांच्यापेक्षां हेच मेले आपणाला लवकर धोका देऊं शकतात हें आपणाला मी सांगायला का पाहिजे ? महाराज ! माझी विनंती ऐका आणि या संकटप्रसंगीं आपण महा-विष्णूंना शरण जा !

**इंद्र**––महाविष्णूंची धरसोड माझ्या परिचयाची आहे ! मी माझी सारीं अस्त्रं उपयोगांत आणणार आणि माझ्या मनाप्रमाणं वागणार ! शची ! तूं माझी विवाहित पत्नी आहेस ! माझं सुख तें तुझं सुख ! माझ्या सुखाकरितां मी योजीत असलेल्या बऱ्यावाईट मार्गांत मला तुझी संमति असणं हें तुझं कर्तव्यच आहे ! तसं नसलं तर मला तुला शापून टाकावं लागेल !

**शची**––महाराज, काय ही आपणासारख्या वीराच्या मनाची दुर्बलता ! ज्या विष्णूंच्या प्रसादानं आपण इंद्रपदावर आहांत त्यांच्याबद्दल आपली केवढी अश्रद्धा ? मी आपल्या चरणाची दासी आहें, पण महाराज––

पद. चाल ( वरसत है धनघोर )

**न रुचे हा अविचार । तनमन हें पायिं वाहिलें । पाप पतीचे न सहत आर्या । प्राण जरी पति घे ॥धृ॥ सत्य वदे चित्त जळतसे । भीति मनिं वसे । प्रीति कधीं नसे मिथ्य सदया । हाय सुरवरा हो ॥धृ०॥**

पतीचा अधःपात होत असतांना प्रसंगीं तो टाळण्याकरितां त्याच्याशीं सात्विक विरोध केला असतां विवाहित स्त्रियांना पातक लागत नाहीं. महाराज, पुण्याईची मिळकत पापाचरणानं कशी रक्षण होईल ? पापाचा एवाढासा वास सारा पुण्याईचा नाश करायला बस्स आहे ! महाराज ! माझं ऐका ! त्या पुण्यवंताचं स्वागत करा ! श्रीविष्णुचं साह्य मागा, आपलं शुभच होईल! ( पायां पडते ).

**इंद्र**––( हंसून ) शची ! भोळी आहेस झालं ! आजवर असे अनेक प्रसंग आले पण आजच्यासारखी वेडसर नव्हती झालीस कधीं तूं !

**शची**—आजची आपली मनोवृत्ति नीतिपासून चळल्यासारखी दिसते तशी ती आजवर नव्हती म्हणून तसं कारण पडलं नाहीं. माझ्या पदावर सामान्य अप्सरा बसलेली पहाणं याला मी शुभशकून समजत नाहीं ! देवेंद्रांना तें दूषण आहे ! नीतितत्वांशीं तें विसंगत आहे ! प्रथम आपण समजतां ती परिस्थिति खरोखर आहे काय हें पहावं, असलीच तर तिला काय कारण झालं असावं हें ध्यानांत घ्यावं, तें कारण काढून टाकण्याचा प्रयत्न करावा व त्यानंतर निर्भेळ शत्रुत्व असेल तर न्याय्य मार्गानें त्याचा निकाल लावावा; पण अनीतिच्या देव्हाऱ्यांत पुजलेली भवानी नवसाला पावेल अशी कल्पनाही करूं नये ! मालविके, जा ! मला विचारल्यावांचून बाहेर जाऊं नकोस–

**इंद्र०**--शची ! काय वेड घेतलं आहेस असं ! मालविकेला तिच्या काम-गिरीवर जाऊं दे ! सहज झालेल्या गोष्टीबद्दल असं अकांडतांडव करणं चांगलं काय ?

**शची**—पापाचरण सहज घडलं तरी दोष लागतो ! त्यांतून वरिष्ठ दंड-धारण करणारांना तर त्याबद्दल फारच काळजी घ्यावी लागते !

**इंद्र**--बरं ! चुकलों आम्हीं ! झालं आतां ! आतां तरी मालविकेला जाऊं देतेस ना ? मालविके जा !

**शची**--नको ! तूर्त नको ! सध्याचा मुहूर्त चांगला नाहीं ! मी नार-दांना विचारतें नंतर पाठवावयाचं तिला.

**इंद्र**--( दांत ओठ चावून एकीकडे ) विवाहित पत्नि आहे म्हणून नाहीं तर--( उघड त्रासून ) ते तरी कुठं आहेत इथं ? त्यांची वाट पहात कुठवर बसायचं ? संकट अगदीं गळ्याशीं आलं आहे ! शची ! बघ नाहीं तर मला तुझ्या मताविरुद्ध स्वतःच तें काम करावं लागेल !

**शची**—त्यांत माझ्याविरुद्ध कांहीं नाहीं ! हें भाषण देवेंद्रांना योग्य आहे ! स्वतः उघडउघड रणांगणांत उडी घेणं व शत्रूला नामोहरम करणं यांत वीर्य आहे ! महाराज, याला माझी परवानगी आहे ! मालविके, चल माझी उपहाराची तयारी कर !चल ! बघतेस काय अशी ! चटोर मेली ! --चल ! --( दोघी जातात )

**इंद्र**--स्वतःच्या स्त्रीपुढं प्रसंगीं असे हात टेंकावे लागतात. शची मूर्ख आहे ! आपल्या फायद्याकरितां नीतिशास्त्राला बाजूला सारलंच पाहिजे ! मी स्वतःच तें काम करणार ! प्रत्यक्ष देव आला तरी मी मागें घेणार नाहीं.

( जातो )

---

## प्रवेश ४ था

रस्ता

( भारतमाता व नारद )

**भारत०**--नारदा ! महाविष्णूचं कांहीं कारस्थान तर नाहीं ना यांत ? मला त्याचा पूर्ण अनुभव आहे ! शेषाच्या मऊ शय्येवर झोंप घ्यायला त्यानं

सुरवात केल्यापासून त्यानं माझ्याकडे अगदीं दुर्लक्ष केल्याचं मी जेव्हां त्याला म्हणालें तेव्हां लबाड नुसता हंसला ! मी माझ्या बाळाच्या भेटीकरितां आतुर झालें आहें ! असं म्हणतांच मला अश्वासन देतांना त्यानं तुमच्याकडे तीर्यक दृष्टीनं का रे पाहिलं ? का तुम्हां दोघांचा कांहीं कावा ठरला आहे का रे, मला फसवायचा ? नारदा ! माझ्या बाळाला इथून घेऊन गेल्यावांचून मी रहायची नाहीं बरं. नाहीं तर--

**नारद**--( हंसून ) मातोश्री ! आपण अशा अधीर होऊं नका ! कारस्थानं देवांच्या नित्यशः संवयींतलीं असलीं तरी तुमच्या बाबतींत तरी देव असं कांहीं करणार नाहींत, पण देवाला झालं तरी बऱ्याच गोष्टी बघायच्या असतात-- !

**भारत०**—त्यांत हो काय बघायचं आहे विशेष ? माझा बाळ परत द्यायचा यांत अशी कोणती मोठी अडचणीची बाब आहे ? देवर्षे ! मला तुम्ही आपली भोळीच समजतां नाहीं ? देवाला मी सांगून आलेंच आहें ! त्याचा कावा दिसला कांहीं तर मग बघेन कसला देव आहे तो !--

**नारद**—मातुश्री ! आपण शांत व्हा ! देव लवकरच आपल्या मागोमाग येताहेत ! मी आपणाला वचन दिलं आहे ना कीं, मी आपला बलवंत आपल्या स्वाधीन करीन म्हणून ?

**भारत०**--पण तुमच्यावर माझा विश्वास बिलकूल नाहीं नारदा ! तुम्ही नुसती माझ्या बाळाची भेट देखील करवून दिली नाहीं ! मला ठाऊक असतं तर मी तुमची पर्वा देखील केली नसती ! कुणी मेल्यानं माझा मार्ग चुकवून दिला नि गेलें मी तिकडे क्षीरसागरीं ! तेंहीं पण एका अर्थी बरंच झालं ! विष्णूला न् त्याच्या लक्ष्मीला मला एकवार भेटावयाचं होतं ! माझ्या बाळाला आणखी कांहीं दिवस माझ्याजवळ ठेवलं असतं तर स्वर्गलोक ओस का पडला असता ? ( करुण स्वरांत ) पण दुर्बलांचा घात केला नाहीं तर तो देव कसला ? तें कांहीं नाहीं नारदा, मला अगोदर माझ्या बाळाला भेटीव ! तुमच्या थापा बस्स झाल्या !

**नारद**--( स्व० ) काय करावं आतां ? ही भोळी खरी, पण हिच्याशीं टोलवाटोलवी करून निभाव लागायचा नाहीं ! ( विचार करून ) बलवंताच्या मुक्कामाच्या ठिकाणीं मातुश्रींना अचानक घेऊन जावं व भेट करवून

द्यावी म्हणजे तात्पुरती मानगड मिटली ! मग महाविष्णू आले म्हणजे बाकीचं पाहून घेतील !

**भारत०**——नारदा, फार विचार करतां आहांत ! कसले हो तुम्ही चमत्कारिक लोक आहांत इकडचे ! का इकडचं वास्तव्य असलं म्हणजे बेफिकिरीच जास्त शिरते मस्तकांत ? कुणी मेलं तरी तिकडं लक्षच जात नाहीं ! ( निश्चयानं ) जा ! नारदा ! मला तुमच्या मदतीची जरूरी नाहीं । हा स्वर्गलोक आहे ! इथंच आहे म्हणे माझा बाळ ! आतां मी माझा मार्ग नाहीं चुकायची ! मी त्याला आतां शोधतें बघा ! माझी हांक ऐकली कीं माझा बाळ माझ्यापुढं धांवत येऊन उभा राहील

पद०—( प्रभू जागतो )

**सखा जीव तो हृदयींचा विसावा, धीमंत अरिच्याही चित्तीं ठसावा ध्रु० ॥ घनघोर वरुष तरि हा चळेना या धीरातें मोह डावा, हा मोहिनी घाली सकला जनांना, नत दुरित भावा ॥ ध्रु० ॥**

असलीं उपवनं माझ्या बाळाला फार आवडतात ! या गीतेचा ग्रंथ हातांत घेऊन विश्वंभराच्या कृपेच्या वातावरणांत रममाण होणारा माझा बाळ बघ माझ्या हांकेसरशीं आलाच पाहिजे ! (लोकमान्य व माधविका येतात नमस्कार करितात. ) बाळा बलवंता ! येरे माझ्या ताहुल्या ! भेटरे मला लौकर ! बाळा ! सांग बरं मला टाकून तूं कां इथं आलास ? लाडक्या ! मी तुझा शोध करीत सारखी फिरतें आहें पण बाबा तूं कुठं रे लपला होतास ? नारदा, बघितलंत माझा बाळ आहेना अगदीं तुमच्यांत शोभण्याजोगा ?

**लोक०**——देवर्षे! मी आपणाला प्रणाम करितों! माझ्या मातुश्रींच्या पुण्याइनं आपल्या प्रत्यक्ष दर्शनाचा लाभ मला झाला! मी धन्य आहें !

**नारद**——बलवंता ! आपल्या तपश्चर्येनं तुम्ही आम्हांला लाजविलंत ! आपली योग्यता प्रत्यक्ष महाविष्णूंनीं मला निवेदन केली ! कर्मयोगिन् ! माझा प्रणाम ग्रहण करून मला आलिंगन द्या ! ( आलिंगन )

**लोकमान्य**——या दासाच्या हातून कांहीं प्रभुसेवा झाली असल्यास आपणासारख्यांची कृपा व हें माझं दैवत कारणीभूत आहे ! देवर्षे ! आमची स्थिती कशी काय आहे याची माहिती असेल आपणाला ?

**भारत०**––लागला बोलायला भराभर ! माझा बृहस्पतचि तो ! नारदा, हें रे कोण आणखी? जिथं जातो तिथं आपलं गोत्रच जमा करतोय ! स्वर्गालाही शिकविलास कारे कर्मयोग? ही तुझी शिष्या कारे?

**लोक०**––मातुश्री ! आपण नाहीं ओळखलंत हिला ? देवर्षी भूतभविष्य-वेत्ते आहेत ते सांगतील माझी कल्पना खरी आहे.

**नारद**––ही पूर्वजन्मीं राणीलक्ष्मीबाई नामेकरून भूलोकावर विख्यात होऊन स्वर्ग लोकाला आली ! पृथ्वीवरील अमोल स्त्रीरत्न ह्मणून देवांनीं हिला स्वर्गात कायमच ठेऊन दिलं आहे ! कारण आहे त्याला तसंच !

**भारत०**––माझी लक्ष्मीबाळ ! नारदा ! हीं बहिणभावंडं साऱ्या जगाला भारी आहेत बरं ! बाळ ! तुलाही नेणार बरं मी मत्युलोकाला ! वेडे ! मी तुझी आई आहें ! अग, अगदीं खरोखरीच आहें ! ओळखत नाहींस तूं मला ? लबाडे, ओळखलसन् नाहीं ओळखल्यासारखं करतां ? नारदा बघा दोघेही बहीणभावंडं कशीं हंसताहेत तें ? माझ्या लाडक्यांनों, मला होणारे कष्ट आतां खात्रीनं नाहींसे होणार ! बाळा ! कुठं रे आहे तुझा मुक्काम ? जवळच आहे का इथून ?

**लोक०**––होय मातुश्री ! तें सुवर्णमंदिर दिसतं तेंच माझं निवासस्थान ! चला देवर्षे !–

**नारद**––मी आलोंच या जवळच्या पुष्करणीवरून स्नानसंध्या आटपून ! तुम्ही चला. (जातांना स्व०) कथेला ठीक रंग चढत चालला आहे! (जातात)

चाल–( नैनातोरे )

**दैन्या नेई लयाला भारत । जगाचा हराया भार साजे । मौन धरि त्यासि जनि कोण मानी । यत्ने वरिल सुखाला भारत ध्रु ॥**

**इंद्र**––( प्रवेश करून ) मला वाटलं आयत्या वेळीं नारदमुनी घोटाळा करितात कीं काय ? पण नारद ते नारदच ! जाणलं त्यांनीं माझ्या मनांतलं आणि झाले युक्तीनं बाजूला ! या तिघानांहि माझ्या शस्त्राचाच प्रभाव दाखविला असता पण असल्या धुंगुरट्याकरितां कशाला शस्त्र हवं ? त्यांना नुसतं नागपाशांत बद्ध करून शरण यायला लावलं म्हणजे झालं. हीं माणसं तेजस्वी आहेत, ही गोष्ट खरी ! ती किरीटवाली बाई तर प्रत्यक्ष

लक्ष्मीसारखीच आहे ! ती आपणाला भारतमाता म्हणवते ! हा बलवंत प्रतिशंकरच भासतो; पण माझ्या पराक्रमापुढं त्याची काय प्रतिष्ठा ! शची सांगत होती मार्ग न्यायाचे असावेत ! न्याय काय चाटायचा आहे अशा प्रसंगीं ? यांना नागपाशानं बद्ध करूं म्हणजे सुंठीवांचून खोकला गेला !
(बाण अभिमंत्रून फेंकतो व लोकमान्य भारतमाता बद्ध होऊन बाहेर येतात )

ही माधविकाही मोठी शूर दिसते ! बेकदर नागपाशांना छिन्नविच्छिन्न करून टाकीत आहे ! हिच्या ठिकाणीं एवढा पराक्रम कोठून आला ? हिलाही बांधलीच पाहिजे ! अरे, हें काय, ही चवताळलेल्या वाघिणीसारखी माझे अभिमंत्रित पाश तोडून माझा उपमर्द करीत आहे ! थांब ! राक्षसिणी माझ्या इच्छेच्या आड येणाऱ्या तुला एका बाणानं व त्याबरोबर यांनाही–

( बाण मारायला जातो तों श्रीविष्णु येतात )

**विष्णु**––इंद्रा ! बाण आटप ! या पुण्यवंतांना तुझ्या नागपाशापासून अथवा बाणापासून कांहीं व्हायचं नाहीं.( इंद्राचा हात धरून ) बघ त्यांच्याकडे ! माझीं स्वरूपं दिसतात तिथं ?

( इंद्र भयभीत होतो पडदा पडतो )

( द्वितीयांक समाप्त )

---

# अंक ३ रा

## प्रवेश १ ला

( इंद्राचा दिवाणखाना )

**इंद्र**—मालविके ! भर अमृताचे प्याले भराभर आणि दे मला ! आज सारं अमृत पिऊन टाकणार आहे, मी तपोवनांत जाण्यापूर्वी एकवार सारं सुख अनुभवून घेणार आहें ! देवांनीं केलेली माझी बेअब्रू मी या अमृताबरोबर पिऊन पचविणार आहें ! बेअब्रू ! स्वर्गसाम्राज्याच्या सुरेंद्राची बेअब्रू यानें खरोखरच वाहून जाणार काय ? आण, सोमाचेही कांहीं प्याले ओत माझ्या घशात ! मालविके ! आज लाजूं नकोस. भिऊं नकोस. घाबरूं नकोस. तुझ्याच हातांनीं पाज मला तो सोमरस ! इतका पाज कीं साऱ्या स्वर्गांत अमृत अगर सोम औषधाला सुद्धां शिल्लक राहू नये ! मालविके, वासंतिके, प्या अमृत प्या, सोमपान करा, शचीला बोलवा, तिलाही अमृतपान करवा. आणा ! या इंद्रानं भोगलेलं सुख दुसऱ्या कुणाच्याही वाट्याला येऊं नये ! हं ! भर प्याले ! अशी नाचत ये ! ठीक आहे ! नाचतच प्याले दे मला ! माझ्या भोंवती घेर धरून नाच ! मला तुमचा नाच डोळे भरून पाहूं दे ! माझ्या हजार-ही डोळ्यांनीं तुमचं ते नृत्य अवलोकन करूं दे ! मालविके ! आज तूं माझ्या आज्ञेवरून हा भिल्लीणीचा वेष घेऊन आली आहेस ! भुलव मला ! तुझ्या नृत्याच्या नादांत कैलासनाथांच्या प्रमाणं मला वेडा होऊं दे हं ! चल कर सुरवात, तोंपर्यंत वासंतिके, तूं दे मला अमृत !

( मालविका नृत्यगायन करते )

**मालविका**—झालं आतां मनासारखं ! महाराज—

**इंद्र**—मालविके ! माझ्या प्रयत्नांच्या आड शची आली नसती तर आजला तपोबलाची तयारी करण्याचं मला कारणच पडलं नसतं ! शचीला आयत्यावेळीं नीतिधर्माचं पुराण आठवलं ! माझी बेअब्रू झाली ! महा-विष्णूच्या समोर मला मान खालीं घालावी लागली! बेअब्रू! छे!कपाळांत तिडिक उठली ! मी आतां काय करूं ? ही भडकलेली आग आतां कशी विझेल ?

(ऐकून) " तपश्चर्येनें " "पश्चातापानं" असं कोण म्हणालं? पश्चाताप कसला? मी काय कुणाचं वाईट केलं ? त्या दोघांना नागपाशानें बद्ध केलं ही गोष्ट वाईट झाली ! ( थांबून विचार करून ) हाय हाय ! भारतमाता माझी ही आईच ना ? बलवंत माझा शत्रू कसा ? भारतमातेच्या मांडीवर भगवंताच्या अनेक अवतारांच्या प्रसंगीं मी खेळलों ना ? हाय ! मी अनंत पापी आहें ! भगवंता मला क्षमा करा, भारतमाते ! आई मला क्षमा करा ! मी तुमचा अपराधी आहें--पण तेवढ्यानं माझी बेअब्रू धुऊन निघेल काय ? मालविके,--सांग वरं ! मी पश्चाताप केला तर माझं पातक धुवून निघेल ?--

**माल०**--महाराज ! आपण असं चमत्कारिक भाषण कां करितां ? एवढ्याश्या गोष्टीनं आपल्यासारख्यांनीं भिऊन जाणं योग्य नाहीं ! कुठं पश्चात्ताप शब्द आपण ऐकला ? मला नाहीं ऐकूं आला तो ! उगीच मनाला वाईट वाटून घेऊं नये ! आपण स्वतः शस्त्र घेऊन जाण्यांत अंमळ घाई केली हें सत्य आहे पण तें साधलं नाहीं म्हणून धीर सोडायचा हें नाहीं पसंत ! इंद्रपद अगर वनवास हा ठरलेलाच आहे मग अब्रू राखण्याकरितां असतील तेवढे उपाय करणं हें शहाणपणाचं आहे ! महाराज ! आज्ञा होत असल्यास मीं जातें आपल्या कामगिरीवर !

**इंद्र**—मालविके ! तूं चतुर आहेस, धैर्यवान आहेस पण--पण--देवांचा मुक्काम इथं स्वर्गात आहे हें तूं विसरलीस ! तुझ्या शब्दांत जादू आहे त्यामुळं मी क्षणभर मोहित झालों पण हा पंचाक्षरी–छे–" इंद्रा बाण आटप" हे शब्द उच्चारतांनाची त्यांची मुद्रा व ते भेदक डोळे मला अजून दिसताहेत. नका ! भगवन् ! मी आपला अपराधी आहें ! मालविके, तूं मूर्ख आहेस ! देवांनासुद्धां--

**माल०**--दडपून टाकण्याची माझी इच्छा आहे ! केवळ आपल्या सुखाकरितां हें करण्याची माझी इच्छा आहे ! महाराज ! असे दुर्बल कां होतां? आपण उच्चारलेल्या शब्दांचा मला राग नाहीं ! या साऱ्या स्वर्गलोकाच्या कल्याणाकरितां आपली इच्छा नसली तरी मला तें काम हातीं घेणं भाग आहे! आपली परवानगी मागण्याची माझी इच्छा नाहीं ! दुर्बलराजाचा कारभार त्यांच्या राज्याचं कल्याण इच्छिणारांनीं हातीं घ्यावा हा न्यायच आहे ! महाराज !--

**इंद्र०**—मालविके नको, असं बोलूं नकोस, तुला जय येणार नाहीं ! माझी पक्की खात्री आहे तुझा पराजय होईल! पुण्याईच्या परमावधींची प्रतिमा पहावयाची असेल तर तूं त्या देवतेकडे, भारतमातेकडे पहा ! "पश्चात्ताप" खरं आहे ! हीच पापाची निष्कृती करणारी मोहिनी आहे ! बलवंताकडे पहा ! फार काय पण तुझ्या माधविकेकडे पहा ! चांडाळणी ! त्याच्याकडे मी त्या सायंकाळचें पाहिलं तों भगवंताचीं रूपंच मला दिसलीं ! अहाहा ! या वेळीं माझ्या मनाची गोड स्थिती मला वर्णन सुद्धां करितां येत नाहीं ! मालविके ! हट्ट सोड ! नी तुझं तें पुराण माझ्या पुढं वाचू नकोस! ती पहा, सर्वश्रेष्ठ भगवंतांची सुहास्य मूर्ती माझ्यासमोर दिसायला लागली ! शचीच खरी शहाणी ! मालविके माझं ऐक ! दुष्ट बुद्धी सोड ! शची इतक्यांत इकडे आलीच आणि तिनं ही तुझी मुद्रा पाहिली, तर ती तुला शापून टाकल्यावांचून राहाणार नाहीं ! मघां प्यालेल्या अमृताबरोबर दुष्ट बुद्धीला मात मी पिऊन गेलों आहें ! शाप देण्याकरितां उद्युक्त झालेल्या शचीला मला विरोध करतां येणार नाहीं ! जा ! ( शची येते ) ये ! इंद्राणी ! तुझा अपराधी इंद्र आतां पश्चात्तापानं शुद्ध झाला आहे !

**शची**—नाथ ! मला मोठा आनंद झाला आहे ! पातकावर पातकाची रास न चढवितां पश्चात्तापानं त्याची निष्कृती करणं यांतच भलेपण आहे आणि देवाचं देवपण असल्याच प्रसंगीं कसाला लागत असतं ! मालविके, अशी कपाळाला आठ्या घालून काय उभी आहेस ? काय झालं आहे तुला ?

**इंद्र**— जाऊं दे ! नको बघूंस तिच्याकडे ! तिची प्रकृति जरा ठीक दिसत नाहीं !

**माल०**—माझी प्रकृती ठीक आहे पण मोठमोठ्यांचीं डोकीं ताळ्यावर नाहींत असं मला दिसतं आहे !

**शची**—बेफाम पोरटे ! काय चालविलं आहेस आज हें ? आणि आज असा वेष काय म्हणून ? देवेंद्रांना मेलीनं सारखी भुरळ पाडली आहे !

**इंद्र**—अग, माझ्याच म्हणण्यावरून तिनं हा वेष घेतला आहे ! नको रागाऊंस तिच्यावर ! तिचं डोकंही जरा बिघडलं आहे ! सुखांत वाढलेली !–

**शची**—डोकं कां नाहीं उडवीत मेलीचं ! जा तिकडं । मी तुला

सांगितलं होतं ना कीं माझ्या महालाबाहेर जायचं नाहीं म्हणून ? इकडचं असं यांना डोक्यावर बसवायचं झालं न् मेल्या ह्या अशा शिरजोर झाल्या ! नाहीं गेलीस ! निघतेस का नाहीं ?

**इंद्र**—चलतेस माझ्या बरोबर वनवासाला ? ( शचीस ) राहूं देईनास हिला इथं ! तूं तिच्याकडं लक्ष देऊं नकोस म्हणजे झालं !

**शची**--महाराज ! मला क्षमा करा ! आणिक मोहाला बळी पडून आपण हा असा प्राणघातक प्रसंग आपणांपुढं आणला आहे !

( चाल--अच्छिपियावाहु )

**जीव झुरे अपमान नको हा दासि पदीं विनवित अहा ! ध्रु. कशास मोहिं पडोनी मनास वंचितसां ! कशास घोर निराशा वरोनि नाश असा ? नाथ, पुरे अविचार, पुरे या वारुणिची बरसात अहा !**

पण माझ्या समोर या अवदसेला राणीपदावर आरूढ झालेलं मला पाहवणार नाहीं--

**इंद्र**--हरहर ! भगवंता ! कसंरे मला पेंचांत धरलंस तूं ? शची, मला क्षमा कर ! पण शची ! मोहांच्या विवशस्थितींत दिलेलं वचन खरं वचन नसतं आणि खरं विचारलं तर मीं सांगितलेलं कार्य झाल्यावर तें वचन पूर्ण व्हायचं होतं-- आतां...... काय त्याचं !

**माल०**--काय त्याचं ? साऱ्या जगांत डांगोरा पिटेन कीं इंद्राच्या वचनावर भरंवसा ठेऊं नका ! माघार आपण घेतलीत मी नव्हे !

**शची**--नको, तसं नको व्हायला ! मी तोड काढतें ! महाराज ! आपण मला क्षमा करा ! कोणत्याही स्थितींत दिलेलं असो, वचन खरं करणं हें आपणाला उचित आहे ! त्याला तोड हीच कीं मला तुम्हां दोघांनाही शाप द्यावा लागेल !

**इंद्र**--शाप !

**शची**—होय शाप ! कांहीं काळ भूलोकावर आपणा दोघांनाहीं मला धाडावं लागेल. त्यावेळीं ही मालविका केवळ आपल्या वचनाकरितां आपली राणी होऊन राहील ! एका तपानंतर हिमाचलावर आपली नी माझी भेट होईल व ही सटवी कुबुद्ध कारस्थान करणारी म्हणून परतंत्र देशांत जन्म घेईल !

[library stamp] ६०८ ... ९।१२५


## प्रवेश २ रा

स्थळ–रस्ता

( भारतमाता व माधविका. माधविका पुरुषवेशांत अश्वारुढ )

**माध०**––आई ! घेऊन दाखवूं एक उडी ?

**भारत०**—नको ! अशी उतावीळ होऊं नकोस ! माझ्याबरोबर चल म्हणजे बघेन सारं ! फारा दिवसांत तुला या वेशांत पाहिलं नाहीं. म्हटलं एकवार माझ्या गुणांच्या लक्ष्मीला बघावं तिच्या जुन्या वीर वेषांत ! मी तुला फक्त पुरुषवेषच घ्यायला सांगितला तो तूं आपली घोडीही घेऊन आलीस ! कुठूनग आणलं हें सारं ? चरूं दे तुझ्या घोड्याला अमळ ! पळून नाहीं जायचा !

**माध०**––देवेंद्रांच्या वस्त्रागारांत गेलें न् घेतला हा सारा सरंजाम ! वेष चढवला न् घोडीवर बसण्याचा मोह आवरेना! गेलें अश्वशाळेंत आणि सोडली खास इंद्राणीची घोडी नि आलें ही अशी धांवत ! ही तल्वार खास देवेंद्रांचीच आहे !

**भारत०**—( हंसून ) म्हणजे देवेंद्रांच्या घरावर दरवडाच घातलास एकूण ! तूं बाई भारीच अचपळ आहेस !

**माध०**—मी हें नेहमींकरतां थोडंच आणलं आहे ? तुम्हांला दाखविलं कीं देईन परत करून ! देवेंद्रांना मागणी केली असती तर त्यांनीं ओरडतच ठेवलं असतं !

**भारत०**–वीरपुरुषांपेक्षां वीरस्त्रियांची धडाडीच दांडगी असते ! पोरी तुझा पराक्रम पहायला देव विसरला म्हणून माझ्या नशिबीं––( रडूं लागते )

**माध०**––आई अशा रडूं नका ! तुम्हांला रडतांना पाहिलं म्हणजे माझं मस्तक भणाणून जातं ! या स्वर्गांत डांबून पडल्यापडल्याच याला असा पाताळांत दडपून द्यावसं मला वाटतं ! धर्मलंडांचं पारिपत्य करून भक्तीचा एकजात हलकल्लोळ माजवावासं वाटतं ! दुपारच्या नारायणाची प्रखरता नुसत्या डोळ्यांवाटें ओतून अधर्मीयांचा नायनाट करावासा वाटतो ! ––नाहीं–आई, मीं तरवारीला नाहीं हात घालीत ! मला बळवंतांनीं सांगितलं तिला कित्येक वर्षं किंबहुना कित्येक शतकें म्यान करावी लागणार आहे ! नको ! तुम्हांला दुःख होत असेल तर मी तिच्याकडे पाहाणार सुद्धां नाहीं !

**भारत०**--माझी गुणांची बाळ ! दुर्दैवाच्या प्रखर अग्नींत माझ्या बाळांचं शौर्य भाजून निघालं ! तुझा काळ झाल्यानंतर आम्ही शस्त्रसंन्यासच केला ! खरं विचारशील तर काळाचा ओघच आतां असा पालटला आहे कीं, त्याला जवळजवळ विश्रांतिच मिळाली ! माझ्या बळवंतानं सांगितलं ना सारं तुला ? झालं तर ! नको शस्त्र नि अस्त्रं ! मला तुह्मी पाहिजे आहांत ! तुह्मी सारे माझ्या पुढं असलां म्हणजे माझं दैन्य निघून जाईल ! माझी सरू अगदीं तुझ्यासारखीच आहे बघ ! तुम्ही दोघीं जणीं माझी सेवा करायला लागलां तर माझ्या मुलांच्या पराक्रमाची तोड साऱ्या जगांतही सांपडावयाची नाहीं !

**माध०**--पण आई ! देव पाठवतील मला लवकर तुमच्याबरोबर ! तिथल्या रहाटीप्रमाणं मीं अगदीं लहान बाळ होईन नाहीं का प्रथम ?

**भारत०**--होय बाळ ! पण तुह्मी वाढीस लागलांत ह्मणजे माझे पांग फिटायला आरंभ होईल ! तुह्मी आपल्या तारुण्याच्या तेजानं साऱ्या विश्वाचे डोळे दिपवून काढाल व मग मला तुमच्या पराक्रमापुढं सारं जग ठेंगणं दिसेल ! माझं गेलेलं वैभव परत मिळाल्यावर जेव्हां माझ्यासमोर पृथ्वीवरील सारे लोक गुढगे टेकतलि त्या काळाकरितां मी प्रत्यक्ष वैकुंठविहारीला घेऊन येईन. त्याच्याकडून तुमचं कौतुक करवीन व त्याची विजयी वैजयंती मी तुमच्या गळ्यांत घालवीन !

( चाल--दयासागरा, रामानुजा )

**सख्या, दीनांच्या कैवारिया । दाविं मार्ग सोपा । जिवा या थारा कैवारिया ! ध्रु. ॥ नरसिंह बाला । तुज ताप झाला । हीन दीन माता सुखी केली त्वा । कैवारिया !"**

**माध०**-- आई ! अहाहा ! तो मंगल प्रसंग मला पहायला मिळण्याचं माझं भाग्य असेल का ? देव माझ्यावर दया करतील का ? देव सांगतील तसंच मी करीन, तशीच अगदीं तंतोतंत वागेन, पण देवांना एवढी विनंति कराच !

**भारत०**--मी आलेंच आहें तर तुला नेल्यावांचून जाणार नाहीं बरं बाळ ! महाविष्णूला माझं म्हणणं ऐकावंच लागेल, इतकंच नव्हे तर त्यांना आतां आपली झोंपही विसरावी लागेल !

**माध०**––अहाहा ! आई ! बघितलंत काय ? श्रीमहाविष्णू आणि नारद त्या पर्वतशृंगावर बसलेले आहेत ! जवळ श्रीबळवंतही आहेत ! चला त्यांना आतांच जाऊन विनंति करूं या !

**भारत०**––चल बाई ! ह्याची आपली दिरंगाई चालतच असते ! याला घाई कशी ती नाहींच ! दुसऱ्याचा जीव गेला तरी बेहेत्तर, पण याचं आपलं सारं सावकास ! जरा एकदां पुन्हां झणझणवला पाहिजे त्यावांचून यायचा नाहीं ताळ्यावर !

( जातात )

---

## प्रवेश ३ रा

( अमरावतीजवळील पर्वताचा पायथा

नारद आणि इंद्र )

**नारद**––कां देवेंद्रा ! इकडं कुणीकडं यावेळीं ?

**इंद्र**––म्हटलं भगवानांचं दर्शन घ्यावं ! आजकाल इतके दिवस इथं देवांचं वास्तव्य आहे पण दर्शनाचा लाभ कसा तो मिळतच नाहीं ! सदासर्वदा बळवंत आणि ते !

**नारद**––भगवंतांचं हें असंच आहे ! आतांच बघा ना गेले आहेत पलीकडे तो बळवंताचा ग्रंथ घेऊन बोलत बोलत !

**इंद्र**––इतका का सुंदर ग्रंथ आहे तो ? आपण वाचलाच असेल ?

**नारद**––वाचला म्हणून काय म्हणतां ? प्रत्यक्ष भगवंतांच्या तोंडून निरूपण ऐकलं आहे त्यावर ! आजकाल सांजसकाळ निरूपणाचा सारखा भडिमार चालला आहे ! भोळी भारतमाता ! दिवसगत होते आहे पण दोघांचं निरूपण चाललं कीं कौतुकानं मुग्धच होऊन जाते !'

**इंद्र**––मला ऐकायला नाहीं कां मिळणार तो ग्रंथ देवर्षे ? त्यांतलं सांगा ना मला थोडक्यांत ?

**नारद**–तो ग्रंथ समग्रच पहायला हवा ! निरूपणच ऐकायचं तर तें प्रत्यक्ष ग्रंथकाराच्या अगर भगवानांच्या मुखांतून ऐकावं ! वा ! मोठा आनंद !

भगवान म्हणाले, ' मलासुद्धां गीता सांगतांना असला अभ्यर्थ अभिप्रेत नव्हता ?

इंद्र०---भगवानच ते ! प्रशंसा करायची म्हणजे अघळपघळच ! गीतेवर टीका आहे तर ! गीता ग्रंथ फार सुंदर ! कर्मसंन्यासाची थोरवी मोठी ! भूलोकचा आद्य शंकराचार्य इथं आला होता–देवर्षींना माहित आहेच–कैलासीं तपश्चर्या करीत आहे तो–त्यानंही असलंच एक बाड आणलं होतं आपल्या बरोबर ! जाडा विद्वान ! कर्मसंन्यासाची थोरवी त्यांनीं अस्खलितपणानं वर्णन केली. मी तर डुलायला लागलों ! कांहो नारद मुने ! हा ग्रंथ प्राकृतांत आहे नाहीं ?

नारद---होय !

इंद्र---मग हे बहुधा त्या ग्रंथाचं रूपांतरच असावं ! कांहीं ठिकाणीं साधारणपणें प्रमाणं जास्त घालून विस्तृत केलं असावं !

नारद०---( हंसून ) देवेंद्रा ! तुम्हां स्वर्गलोकच्या मंडळींचें चुकतं तें इथंच ! ज्या मृत्युलोकच्या तुमचा एवढा गाढा संबंध तिथं काय चाललं असतं याची तुम्हांला दाद लागत नसते व नंतर कांहीं एकदम गडबडण्यासारखं झालं म्हणजे तुह्मी शुद्धीवर येतां ! मी खोटं बोलत नाहीं ! तुझ्या वरुणाला विचार, भारतावर अवर्षणांवर अवर्षण कां पडतात? तुझ्या कोषाध्यक्षाचा जबाब घे कीं भारत इतकं दरिद्री कां झालं आहे ! तुझ्या यमाला म्हणावं भारतावर मृत्यु संख्येचं एवढं दांडगं प्रमाण कां म्हणून ? अरे, तूं विलासांत निमग्न झालास त्याबरोबर हे तुझे लोकही विलासी बनले ! तेथले लोक तुमचं आपल्या रोजच्या नित्यकर्मांतून व यज्ञातून हविर्भाग देऊन स्मरण करितात, पण तुमचं लक्ष त्यांच्याकडे मुळींच नाहीं याला काय म्हणावं ? तुझी आणि भारतमातेची गांठ पडली नाहीं म्हणून बरं झालं ! नाहींतर तिनं तुला क्षणांत शापून टाकलं असतं, इतके तुम्ही कृतघ्न आहांत ! देवेंद्रा ! कठोर शब्द बोलल्याबद्दल मला वाईट म्हण. तुमची बेपर्वाई इतकी भयंकर आहे कीं तिचे परिणाम साऱ्या जगाला भोंवायला लागले आहेत ! धर्माचा लोप केवळ तुमच्यामुळं झाला ! कर्माचं फळ मिळेनासं झालं. लोकांनीं कर्मत्याग केला. निरनिराळ्या संस्कृतींचा संग्राम हल्लीं भारताइतका कोणत्याही देशावर बघावयास मिळत नाहीं ! गोहननापायीं सारा प्रदेश उध्वस्त होतो कीं काय अशी भीति पडली आहे. आलस्य, बंधुद्रोह वगैरे

पिशाचें या अवनतीच्या पोटीं जन्माला आलीं आहेत. एवढ्या करितांच बळवंतानं श्रीगीतेवर कर्मयोगप्रतिपादक टीका लिहिली आहे! कर्मसंन्यासपर नाहीं बरं?

**इंद्र**--नारदमुने! खरंच कां हें? पण आतां त्याचं काय? मी थोडाच इंद्रपदावर राहणार आहे? बळवंत प्रत्यक्षच इंद्रपदावर आरूढ झाला म्हणजे तो करील सारं ठीक! मी राहिलों असतों तर मंत्रिमंडळाला शिक्षा करून तेथली परिस्थिती दुरुस्त केली असती.

**नारद**--अँ: देवेंद्रा! हें काय? ही संन्यासाची का तयारी आहे? तरीच स्वारी आज अगदीं साध्या वेषांत आहे! तुम्हांला पाहून कुणीं म्हणायचं कीं देवेंद्र तुम्ही नव्हतच म्हणून! नको—

**इंद्र**--मी तपश्चर्येची तयारी करूनच इकडे भगवंतांच्या दर्शनाकरितां आलों आहें! माझ्या त्या दिवशींच्या वर्तनाबद्दल मला पूर्ण पश्चात्ताप झाला असून योग्य अधिकाऱ्यांच्या हातीं सूत्रं देणंच उचित आहे अशी माझी खात्री झाली आहे! इंद्रपद कांहीं वडिलोपार्जित संपत्ति नव्हे!

**नारद**--( हंसून ) देवेंद्रा! असे उतावीळ होऊं नका! मी तुह्मांला सांगितलं ना तुह्मांला धोका नाहीं म्हणून! कुणीं सांगितलं हो तुह्मांला हा असा बावळटपणा करायला? ( स्वगत ) आंच अगदीं व्यवस्थेशीर लागली आहे! आतां जास्त तापवण्यांत अर्थ नाहीं! ठीक मौज येत आहे!

**इंद्र**--धोका असो वा नसो पण मीं जें एकदां ठरविलं आहे तें पूर्ण विचार करूनच ठरवलं आहे! कशाला पाहिजे उगीच भानगड न् वादविवाद! देव इथं प्रत्यक्ष आहेतच, सांगावं त्यांना आपल्या हस्तेंच व्यवस्था करावी म्हणून! मला तें इंद्रपदही नको न् कांहीं नको!

**नारद**—( हंसून ) ठीक आहे! मग मी उगीच या भानगडींत पडलों म्हणायचा? अरे इकडून तिकडे उगाच फुकट हिंडविण्याकरितं का तुम्ही "वांचवा" म्हणून माझी पायधरणी करीत होतां? भगवानांचो समजूत घालायला मला कोण प्रयास पडले! ऐन यशाच्या वेळीं मला असे तोंडघशीं पाडले तर संभाळा--

**इंद्र**--( विस्मययुक्त स्मित करून ) भारतमाता संतुष्ट होऊन परत जाणं शक्य असून इंद्रपद माझं मला कायम राहील म्हणतां?

**नारद०**——नाहीं तर काय ? भारतमाता रडत राहून तुमचं इंद्रपद काय, किंवा कुणाचंही पद काय कायम कसं राहणार ? असे जरा मार्गावर या ! त्रागा करण्यापासून कांहीं उपयोग नाहीं व्हायचा ? अहो सत्ता हातीं आली म्हणजे नुसता विलासच करूं नये ! सत्तेचा उपभोग कामापुरता घेऊन आपल्या अधिकारायोग्य असं लोकपालनाचं पवित्र कर्तव्य करण्यांत काळ घालविलांत म्हणजे झालं ! आजवर तुमचं चुकलं तें इथंच !

**इंद्र**——असं आहे तर—मग—माझी संमति आहे ! पण भगवान माझ्यावर भारी रुष्ट झाले असतील त्या प्रसंगामुळं !

**नारद०**——वेडे आहांत ! भगवंतांना सगळ्या प्रकारच्या माणसांचा परिचय आहे ! ( हळूच ) नंतर मला भगवान म्हणाले—सांगूं—काय म्हणाले तें ? नाहीं तर रागवाल——

**इंद्र०**——सांगा ! काय म्हणाले भगवान् ?——

**नारद**——भगवान म्हणाले—मजजवळच म्हणाले अँ,——कीं " इंद्र मूर्ख आहेत. सत्तेपुढें शहाणपण चालत नसलं तरी सत्ताधाऱ्यांनीं शहाणपणानंच सत्ता गाजविली पाहिजे ! नाहींतर हें असं होतं ! "

**इंद्र**——पुढें ?——

**नारद**—— पुढें काय, एवढं बोलून मनसोक्त हंसले ! दुसरं काय !

**इंद्र**—देवर्षे ! अगदीं खरंच हें ! मग भगवंतांचा राग नाहीं माझ्यावर ? चला, आतां जरा मला बरं वाटायला लागलं ! भगवानांना लवकरच भेटतों मी. पण आपण बरोबर असायला हवं ! इंद्राणीला ही आनंदाची बातमी सांगतों जाऊन ! ( जातां जातां ) येतां ना प्रासादांत ?——( लगबगीनें जातो )

**नारद**—संन्यासाकरितां उतावळा झाला होता ! आतां परतला पुन्हां पदप्राप्तीच्या आनंदांकडं पुन्हां तितक्याच उतावळीनं ! जरा स्वारी पुन्हां ठाकठिक होऊन देवांच्या दर्शनाला आली म्हणजे उडेल मजा आणखी ! भगवंतांनीं अगदीं निश्चयच केला आहे मला देखील थांग न लागूं देण्याचा ! काय करणार आहांत म्हणून विचारावं म्हणजे " पाहूं " म्हणून उत्तर ठेवलेलंच ! इतके डोळे आहेत तरी दिसतच नाहीं कां अजून यांना ? माझी तर कांहींच कल्पना चालत नाहीं ! देऊं का भारतमातेला लाऊन देवांच्या मागं!



भारतमाता:—हां हां नारायणा, चक्र आटोपा.

पण नको ! उगीच देवांचा इतका छळ चांगला नाहीं ! देव जर कुणाला भीत असतील तर तिच्या रोषाला ! बघावी एक दोन दिवस वाट न् मग पाहतां येईल पुढं काय करायचं तें ! आपण आपलं देवाला रोखठोक सांगून ठेवलं आहे कीं माझ्या मताप्रमाणं झालं नाहीं तर तुमचं आमचं युद्ध ठर-लेलंच ! ( जातात. )

( चाल—धनुसायका )

**बलनायका । वरिते जयश्री । श्रमहारका । शुभदायका ।।धृ०।। अवघ्या जनीं । जनि सार्थ केली । हरिची सुखदा । समजा पताका ।**

---

## प्रवेश ४ था

स्थळ—नदीकिनारा

( भगवान विष्णू प्र० करितात )

**विष्णू**—नारदानं काय टुमणं लावलं आहे माझ्या मागं ! भारतमाता तर बलवंत भेटल्याबरोबर व माझ्या गोड आश्वासनानं परत जायचं आहे किंवा काय हें देखील विसरल्यासारखी झाली आहे. नारदाला आपल्या वच-नाची केवढी प्रतिष्ठा व त्याकरितां म्हणे माझ्याशीं युद्ध करणार आहे तो ! एकूण जगाला एखादा अलौकिक चमत्कार पहायला मिळणार हें खास ! ( विचार करून ) बलवंताला परत पाठविल्यावांचून गत्यंतर नाहीं ! भोळी भारतमाता माझ्या गोड भाषणाला गुंगल्यासारखी दिसत असली तरी तिला तिच्या घराचं स्मरण येणार नाहीं असं कसं होईल ? मोठी कठीण परिस्थिती आली आहे !

( चाल—पीतम सैंया )

**भारत-माता-ताप सहेना । या मना । विश्वजननि वरि अमर गुणाधना । यश-गाना पुण्य-लाभ ॥**

नारद उतावळा झाला आहे. इंद्र उदासीन होऊन तपश्चर्येला जायला तयार झाला आहे. इंद्राणीच्या तोंडाकडे तर पाहवतच नाहीं. माधविका भूलोकांवर जायला मिळणार म्हणून आपल्याच आनंदांत गर्क होऊन नाचत आहे. बलवंत तर परत जायला मूळपासूनच अधीर झालेला. अशी एकंदर

भानगड आज या स्वर्गलोकांत चालू आहे ! प्रत्येकाला स्वतंत्र तऱ्हेनें सांगतांना सर्व कांहीं ठाकठीक होऊन सर्वांचाच संतोष व्हावा याबद्दल माझी धडपड चालली आहे. ( पाहून ) अरे पण हा नारद घाईघाईनें कुठें निघाला आहे असा ? कां नारदा--

**नारद**--देवा ! बस्स झाली आपली दिरंगाई ! काय केलंत आपण माझ्या कामाचं ? तुमचीं गुळमुळीत भाषणं आतां पुरे नाहीं का झालीं ? लवकरच तोड काढतों म्हणून आपण भारतमातेला सांगितलंन् दिवसगत झाल्यामुळं तिनं आतां माझी अशी खरडपट्टी—

**विष्णु**—तरीच--( हंसतात )

**नारद**--तुमचं हें नेहमींचं हसणंच देवा मोठं वाईट आहे ! कुणावर कसाही प्रसंग येवो तुम्ही आपले हंसतच !

**विष्णू**—पण नारदा—माझं ऐकून तर घेशील ?

**नारद**--काय ऐकायचं आहे आपलं ? आपण कांहीं तरी असं बोलतां कीं त्याचा सरळ अर्थच लागत नाहीं ! आपली ही जुनीच खोड आहे ! गीतेंतल्या आपल्या वचनावर काय काय रण माजलें हें आपल्या ध्यानांत कशाला येईल ? माझा आपल्या वचनावर आतां मुळींच भरंवसा नाहीं ! ( स्वगत ) होऊन द्याच समोरासमोर जरा थोडंस !

**विष्णु**--अरे पण मी कधीं खोटं बोललों आहें काय ? मी त्याच विचारांत होतों पण—

**नारद**--अझून विचारांतच ! आणि तो विचार संपून आचारांत यायला युगंची युगं लोटणार ! बस्स देवा ! आपण युद्धाला तयार व्हा ! याच घट केला सोक्षमोक्ष पाहिजे ! मी तयारीनंच आलों आहे ! हं !

**विष्णु**--अरे पण शस्त्रास्त्रं कुठं आहेत तुझीं युद्धाचीं ? माझ्या जवळ माझं चक्र आहे हें बघून घे एकदां ! मरशील फुकट. पण त्यापूर्वीं मला हें सांग कीं तुह्मीं मोठे शांतिब्रह्माचे अवतार ह्मणवतां आणि तुमची ही अशी युद्धापर्यंत कशी मजल जाते ?

**नारद**--याचं उत्तर देवा ! आपण आपल्या मनालाच विचारा. शांतीलाही कांहीं सीमा आहे असं आपणाला नाहीं वाटत ! युगानुयुगं शांति कशी टिकेल ? शांतीच्या जीवनस्वराला एखादा संवादी स्वर आपण मिळवाल

तर कीं नाहीं ? बघतों, विचार करितों, ही आपली भाषा नित्याचीच आहे! अज्ञानं देवा, माझा युद्धाचा आवेश कमी होणार नाहीं ! व्हा तयार ! माझी प्रतिज्ञा आहे--

**विष्णू**—( हंसून ) ठीक ! सोडं चक्र ?

**नारद**—थांबा मला माझं शस्त्र आणूं द्या ! याच झाडाखालीं ठेवलं आहे ! आपण दिसलांत त्या गडबडींत विसरलों ! ( जातो )

**विष्णु**--लढवय्येच दांडगे ! हे असे शस्त्र विसणारे ह्मणे लढाई मारणार! बघूं तर कोणतं शस्त्र-( ना. येतो )

**नारद**--हं. देवा ! ( धनुष्य सरसावतो )

**विष्णू**--अरे, हें तर माझं शार्ङ्ग आहे !

**नारद**--मग ज्याचं शस्त्र त्याच्यावरच चालवावं हें जगाला कुणीं शिकविलं? आतां प्रश्न नको ! आपणांला भर युद्धाच्या धुमश्चक्रींत तत्त्वज्ञान आठवलं ! मला नाहीं आटोप तेवढा! आवेशाच्या झटक्यासरशीं काम करून घेतलं पाहिजे हें माझं तत्त्वज्ञान आहे !

**विष्णु**--नारदा ! ऐक माझं. अरे मी सगळा विचार करून ठेवला आहे। माझं चक्र सुटलं नाहीं तोंवरच साऱ्या गमजा चालतील ! तूं माझा भक्त आहेस ना ?

**नारद**--एकदां सोडून दहादां म्हणतों कीं मीं आपला भक्त आहें. नम्र-सेवक आहें. पण या वेळीं तें नातें मला संमत नाहीं! ही युद्धाची घटका आहे! आपण माझे प्रतिपक्षी—

**विष्णु**--( हंसून ) ठीक आहे! ओढ तर प्रत्यंचा! ( श्रीविष्णू चक्र फिरवितात. नारद धनुष्यावर बाण चढवितात, इतक्यांत भारतमाता व लोकमान्य येतात. )

**भारत०**--हां हां ! नारायणा ! चक्र आटोप !

**लोकमान्य**--देवर्षे ! बाण आटोपा ! ( देवांना हात जोडून ) देवा ! कृपा करा ! आपलं चक्र आंवरा ! माझ्या गळ्यावर चालवा तें. पण--

**भारत०**--नारायणा ! नारदा ! याला मी काय नांव देऊं ?

**नारद**--आई ! माझ्या प्रतिज्ञेकारितां, आपल्याच करितां, मी हें युद्ध आरंभलं आहे ! देवांची दिरंगाई--

**विष्णू**—( हंसून ) आई, बळवंता! मी कांहीं नारदाला मारणार नव्हतों, पण--

**नारद**--ऐका ! चक्र सरसावलंन् म्हणे मारणार नव्हतों! याच तर गोष्टी देवा, मला पसंत नाहींत! तथापि देव कबूल असतील तर संधि करायला आपली तयारी आहे! हो ! नको उगीच देवाला विद्ध झालेला पहायला!

**भारत०**--नारायणा !

**विष्णु**—मी खरंच सांगतों मी आपला उगीच नारदाला भिववीत होतों. माझं चक्र निराळ्याच दिशेला गेलं असतं! मी माझ्या भक्तांचा-संतांचा संहार करीत नसतों. नारदा ! चल, अशी वृत्ति तुला शोभत नाहीं। आण तें धनुष्य इकडं! बाण चढवतां तरी आला का तुला त्यावर? तो फाळ स्वतः-कडं रोखून माझ्याकडं त्याचं पुच्छ रोखलं होतंस! ( हंसतात )

**नारद**--खरं कीं काय? ( सर्व हंसतात ) चुकलं तर देवा! आतां काय करायचं तें लवकर करा।

**विष्णू**--मी सगळी व्यवस्था करून ठेविली आहे! तूं पुढें जा व इंद्राला ( कानांत ) असं सांग! अगदीं काळजीपूर्वक!

**नारद**--एकूण देवांनीं सारी व्यवस्था केलीच होती तर! उगीच रागावलों मी देवावर! देव फार दयाळू आहेत! देवा ! चाललोंच मी तिकडं! आपण सर्वजण लवकर या! ( नारद आनंदित होऊन जातात)

**विष्णू**--आई, बळवंता! चला आतां आपण इंद्रसभेंत जाऊं! तुमच्या इच्छेप्रमाणं लवकरच होईल!

**भारत०**—चल बाबा! तुझं हें गुपित कारस्थान कुणाला कळेल तर शपथ. बाळा, चल! देवाची दया आहे आपल्यावर.

( चालः--फडकली प्रेमध्वजा )

**विजयदा जगिं देवता ॥ विदितयश खचित गीता ॥ ध्रु० ॥**
**जननीदैन्यावना । शिणुनि त्यजित प्राणा ॥ विफलबल ना करीं ।**
**वरित सगुण देह देता ॥ १ ॥**

( जातात. )

## प्रवेश ५ वा

( राजमहालापुढील दालन )

**इंद्र**––देवांची कारस्थानं देवानांच साधतात ! दुःख न होतांच कांटा कसा काढावा हें त्यांनाच माहीत ! एकेक बाजू मला कशी बिनचूक सांगून ठेविली आहे ! ( शची येते ) इंद्राणी ! झाली काय सर्व तयारी तिकडं ! दरबार खाजगी असला तरी स्वतः श्रीविष्णू आज अध्यक्ष आहेत ! यम, अग्नी, वरुण, कुबेर वगैरे मंडळी आली आहेत ना ?

**शची०**––अशी कशी आठवण इकडची ? त्यांना बोलवायला देवांनीं सांगितलंच नाहीं मुळीं ! त्यांच्यापैकीं कुणालाही यांतलं कळून द्यायचं नाहीं व कारभार पूर्वीप्रमाणेंच चालूं असायचा असं नाहीं का––

**इंद्र**––समजलों ! आनंदाच्या भरांत मला त्याचं भानच राहिलं नाहीं ! बरं तूं आंत जाऊन पुन्हां एकदां सर्व तयारी बघून घे ! माधविका, मालविका वगैरेंनाही अगदीं तयार असूं दे !

**शची**––सर्व अगदीं ठाकठीक आहे ! माधविका तर अगदीं आनंदानं नुसती उड्या मारीत आहे ! ती म्हणते आज मी स्वर्गांतलं माझं शेवटलं नृत्य करणार ! त्रिखंडाचं राज्य मिळाल्यासारखं झालं आहे तिला ! मालविकाही–

**इंद्र**––समजलं ! त्या दोघीही मोठ्या गोड मनाच्या आहेत ! चल ! आंत नारदमुनीही आले असतील ! मी भगवंतांची वाट पहात इथंच उभा राहतों ! ( शची जाते ) देवांना यायला कां बरं उशीर लागला ? ( आवाज ऐकून ) आलेच महाद्वारांत ! दुंदुभी वाजायला लागल्या ! आज माझ्या अंतःकरणांत अपूर्व आनंद उचंबळला आहे ! असा योग स्वर्गांत क्वचितच येत असतो ! ( श्रीविष्णू, भारतमाता, लोकमान्य येतात. इंद्र त्यांना सामोरा जातो. )

**विष्णू**––का देवेंद्रा, सर्व तयारी आहेना ?

**लोकमान्य**––स्वर्गसम्राट् मी आपणाला अभिवंदन करितों !

**इंद्र**––महाभाग ! मी आपल्या दर्शनानं कृतार्थ झालों ! आपली योग्यता न जाणतां––

**भारत०**––देवेंद्र ! आतां काय त्याचं ? या आनंदाच्या प्रसंगीं––

**विष्णु**–( पाहून ) नारद आज अगदीं गडबडींत आहे! मोठा भोळा प्राणी !

**लोकमान्य**––देवा ! आपले सारे भक्त असेच निर्मळ मनाचे असतात !

**इंद्र**––चलायचं आंत.

( पडदा उघडून आंतील दरबाराचा देखावा )

( इंद्र बळवंतांना सामोरा जाऊन सिंहासनाकडे घेऊन जातो )

**लोक०**––छे! छे! देवेंद्र! आपल्या सिंहासनाला मी पदस्पर्श करणार नाहीं! मी त्याची केव्हांही अपेक्षा केली नव्हती! त्यावर माझा मुळींच हक्क नाहीं! मला माझ्या आईचं सिंहासन पाहिजे आहे! माझी विनंति मान्य करून मला माझ्या देशांत परत पाठविण्याची कृपा करावी व आपण सर्वत्रांनीं आम्हांला आशीर्वाद देऊन आमच्यावर निरंतर कृपादृष्टी ठेवावी एवढीच माझी इच्छा आहे.

**नारद**––अहाहा! धवलयशोमूर्ते! धन्य आहे तुझी! तुझ्या पुण्याईनं काय साध्य होणार नाहीं?

**भारतमाता**––( गहिंवरून ) माझ्या लाडक्या ! तुझ्यावरून मी शंभर स्वर्ग ओवाळून टाकीन! देवा! आतां विलंब लावूं नकोस! परंपरा मोड! नवी सृष्टी निर्माण कर, काय रुचेल तें कर. पण आतां आम्हांला परत जाऊं दे.

**इंद्र**––देवी ! आसनावर बसावं ! पूजाग्रहण करावी !

( हारतुरे वगैरे )

**माध०**––( भारतमातेजवळ जाऊन ) आई ! माझ्याबद्दल देवांना विनंति केलीत ना ?

**भारत०**—देव करतील बरं बाळ सारं आपल्या मनासारखं !

**श्रीविष्णू**—माधविके, मला दुःख होतं, तुला एकदम भूलोकीं पाठवितां येत नाहीं ! तुला बारा वर्षे हिमाचलावर तपश्चर्या करावी लागेल. त्यानंतर श्रीशंकर तुझी रवानगी भारतावर करून देतील व मग सारं तुझ्या मनासारखं होईल. ( माधविका हिरमुसली होते )

**लोक०**—देवी ! भगवंताच्या इच्छेप्रमाणं आनंदानं वागलं पाहिजे !



**भारतमाता:**—माझा हा लाल तुझ्या पायावर घालते, त्याला आशीर्वाद दे.

IRBK-0100896
IRBK-0100896
IRBK-0100896

कार्याला लागण्यापूर्वी तपश्चर्या करणं अगत्याचं आहे हें तुम्हांला कळलं आहेना ?

**माध०**—आपला उपदेश उतावळेपणानं मी विसरलें होतें. महाभाग ! मला क्षमा करा ! आजपासून मी स्वतंत्र झालें ! मला महदानंद होत आहे.

**नारद**—देवा ! इंद्राची व मालविकेचीही रवानगी-

**शची**--माझ्या शापांतून इकडे मुक्त व्हायला कांहीं तोड नाहीं काय ? आमची मालविकाही आतां शहाणी झाली आहे !

**विष्णू**--छे ! छे ! आतां त्यांत बदल होणं शक्य नाहीं ! पतिव्रतेचा शाप फिरवायला मी समर्थ नाहीं. देवेंद्रा ! शुभमुहूर्तावर या देहाचा त्याग करून तुम्हीं मालविकेसहवर्तमान मृत्युलोकीं मी सांगेन त्या देशीं जाऊन भारतमातेची सेवा करा. त्या लोकीं तुम्ही राजर्षी व्हाल व लवकरच तुम्ही स्वस्थानीं परत याल. तोंवर इंद्रपदावर देवी इंद्राणीची आम्ही स्थापना करितों ! देवी इंद्राणी ! तुम्ही राज्यकारभाराला अगदीं योग्य आहांत अशी आमची खात्री आहे !

**शची**--जशी प्रभूंची इच्छा !

**नारद**—देवांचा पायघोळ कारभार पुन्हां चालू झाला !

**भारत०**--देवा ! ही सारी व्यवस्था तुम्ही नंतर केली तरी चालेल ! माझा एकेक क्षण मोलाचा आहे !

**विष्णू**—आलोंच मी आतां मूळ पदावर ! नारदा ! ( एकीकडे ) या सर्वांवर मायेचं आवरण घाल !

**नारद**--ॐ नमो भगवते वासुदेवाय ! नारायण ! नारायण ! जय नारायण !

( लोकमान्याची खुर्ची फिरून तिथें एक बाळ दिसतें. )

**विष्णू**—नारदा ! संमोहन काढून टाक ! ( नारद तसें करतों ) देवी ! घ्या आपला बाळ !

**भारत०**--( बाळाला उचलून घेऊन चुंबन घेते. डोळ्यांना पाणी आणून ) देवा ! तुझ्या उपकारांची फेड माझ्याकडून कशी रे होईल ? हा माझा लाल तुझ्या पायावर घालतें त्याला आशीर्वाद दे !

**नारद**--अहाहा ! ईश्वरी लीला अगाध आहे ! ही लीला पहायला मिळावी म्हणून मी कांहीं तरी नवीन कळ उत्पन्न करीत असतों ! जय नारायण !

( सिंहासनाचा पाळणा होतो. त्यावर देव भारतमातेला बाळासह बसवितात )

( भरत वाक्य )

**उदित जगीं बलवंत भास्कर । ज्ञानाकिरणा पसरी जगभर । वंदुं त्या आजि जोडुनी कर ॥ धृ ॥ तेजीं लोपती सर्व उडुगण । शत्रु तहीं गाती तद्‌गुण । मित्र भृंगहि गुंजती गुण । मित्र हा सकलां पुरुषवर ॥**

**सर्वजण**--विजयोस्तु !

( पडदा पडतो )

अंक तिसरा समाप्त

श्रीसीतारामचन्द्रार्पणमस्तु

**समाप्त.**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बा. क्र. ....६९८.... दा. दि ..............
वि. ......५१२५.... क्र. ..............